CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : ३३ सोमवार दि. ०८ ऑगस्ट २०२२ ते रविवार दि. १४ ऑगस्ट २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## नवरदेव फसला दोन लाख गमावून बसला

विटा/क्राईम रिपोर्टर



लग्न हा माणसाच्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा असतो. त्यामुळे लग्न करताना दोन्हीकडच्या लोकांनी एकमेकांची व्यवस्थित माहिती घेऊन पुढे पाय टाकायचा असतो अन्यथा लग्न जुळवणाऱ्या टोळ्यांकडून फसवणूक होण्याचा धोका असतो. हिवरे येथील दत्तात्रय हसबे याचेही तसेच झाले. लग्न जुळवून देणाऱ्या एका टोळीच्या जाळ्यात तो फसला आणि पावणेदोन लाख गमावून बसला. कारण लग्न झाल्यावर दोन दिवसातच ...पान २ वर

# मुलगी झाली म्हणून बापानेच जीवंत पुरले नकुशी बालिकेला अखेर विधात्याने तारले

अहमदाबाद/क्राईम रिपोर्टर

ज्या देशात देशात आज महिलांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा आहे. ज्या देशात महिलांच्या उत्कर्षासाठी बेटी बचाव बेटी पढाव हे आंदोलन चालवले जाते. ज्या देशाच्या सर्वोच्च पदावर एक महिला राष्ट्रपती म्हणून विराजमान आहे. त्याच भारत देशात मुलगी जन्माला आली म्हणून तिच्या जन्मदात्या वडिलांनीच तिला जिवंत गाडून टाकल्याची संतापजनक घटना घडली आहे. पण देव तारी त्याला कोण मारी या म्हणी नुसार बापाने जिवंत गाडलेल्या या बालिकेला लोकांनी खड्ड्यातून उकरून बाहेर काढले. सुदैवाने हि बालिका जिवंत असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी पोलिसांनी त्या बालिकेच्या पालकांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





नकुशीवर ॲम्ब्युलंसमध्ये केले उपचार!

विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुजरातमध्ये हि संतापजनक घटना घडलेली आहे. जे लोक धर्म आणि रूढी परंपरा यांना वाजवीपेक्षा अधिक महत्व देतात अशाच काही लोकांच्या स्त्री विरुद्धच्या संकोचित मानसिकतेतून अशा घटना या देशात घडतात. कारण आजही देशाच्या ग्रामीण भागात स्त्रीला दुय्यम मानले जाते. मुलगी जन्माला आली की काही लोकांना दुख होते. कारण मुलगी हि दिल्या घरची असते. शिवाय ती अबला असल्याने तिच्याकडून भविष्यात आई-वडिलांची देखभाल होऊ शकत नाही. त्यामुळे तिला ठेऊन तरी काय उपयोग असे काही लोकांना वाटते. त्यामुळे मुलीला एकतर गर्भातच मारले जाते किंवा कचरा कुंडीत फेकले जाते. जरी तिला पालकांनी वाढवले तरी तिला मुला इतके प्रेम मिळत नाही. तिच्या संगोपनात पक्षपात केला जातो. उलट मुलाचे लाड पुरवले जातात, त्याला मागेल ते दिले जाते. कारण तो वंशाचा दिवा आहे. असे काही लोकांना वाटत असते आणि अशाच मानसिकतेतून मुलींचे हाल केले जातात. त्यामुळे अशा लोकांवर कठोर कारवाई व्हयला हवी. त्यासाठी धर्मातील स्त्री विरुद्धच्या सर्व रूढी परंपरांना मूठमाती द्यायला होईल आणि सरकारने तसे केले तरच बेटी बचाव बेटी पढाव योजना सफल होईल आणि स्त्रीला खऱ्या अर्थाने सुरक्षित जीवन जगण्याची संधी मिळेल.

मुळचे गांधी नगर येथे राहणारे एक दांपत्य गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील गांभोई गावात आले होते. याच गावात त्या महिलेचे माहेर आहे. दरम्यान या महिलेला अगोदर एक मुलगी आहे. त्यानंतर दुसरीही मुलगी झाल्याने पती पत्नी निराश झाले आणि त्यांनी या मुलीला मारण्याचा निर्णय घेतला. पण मारायला जमले नाही म्हणून मुलीच्या वडिलांनी गुरुवारी गपचूप तिला शेतात ...पान २ वर

# घराबाहेर पडताच आयुष्यातून उठली तीन नराधमांनी तिची 'अब्रू' लुटली



भंडारा/क्राईम रिपोर्टर

घरात किती जरी मोठे भांडण झाले तरी एकट्या दुकट्या महिलेने घराबाहेर पडणे धोक्याचे आहे. कारण महाराष्ट्र आता महिलांसाठी सुरक्षित राहिलेला नाही. साकीनाका बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर महाराष्ट्रात शक्ती कायदा आला. तरीही सामुहिक बलात्काराच्या घटना थांबलेल्या नाहीत. भंडाऱ्यात अशीच एक भयंकर घटना घडली आहे. पती नांदवायला तयार नसल्याने एक महिला बहिणीकडे राहण्यासाठी आली. पण बहिणीबरोबर भांडण झाल्याने ती एकटीच घराबाहेर पडली आणि या महिलेवर तीन नराधमांनी सामुहिक बलात्कार करून तिला चाकूने भोसकून विवस्त्र अवस्थेत रस्त्यावर फेकून दिले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असून पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे.



मदतीचे आश्वसान देऊन भंडाऱ्यात ३५ वर्षीय महिलेवर भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात दोन आरोपींनी वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन केला अत्याचार केल्याची घटना धक्कादायक घडली आहे. एवढंच नाही तर, अत्याचारानंतर पीडितेला रस्त्याकाठी फेकण्यात आलं. पीडितेवर सध्या नागपूर वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु असून याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयित आरोपींना अटक केली असून त्यांना ८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपी अमित सार्वे आणि मोहम्मद अन्सारी या दोघांना पोलिसांनी घटनास्थळी नेऊन तपास सुरु केला आहे. गोंदिया जिल्ह्यातील गोरेगावपासून लाखनीपर्यंत सर्व सीसीटीव्हीच्या आधारावर पोलिसांनी तपास सुरु केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील पहिलाआरोपी मात्र अद्याप देखील फरार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध सुरु आहे. ...पान २ वर

## गांजा वरून दोघांमध्ये भांडणे झाले चिडलेल्या मोनूने सुरजला ठार केले

मुंबई/एस.कुमार



व्यसनी आणि मूर्ख माणसापासून नेहमी सावध राहावे असे चाणक्य निती सांगते. कारण ही माणसे कधी घात करतील याचा भरोसा नाही .या लोकांशी तुम्ही कितीही प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला तरी ते शक्य नाही. येथे तर दोघेही नशेत असल्याने त्या दोघात गांजा पिण्यावरून वाद झाला. या रागात एकाने दुसऱ्या चा खून केला. मुंबईत घडलेल्या या गुन्ह्याची ही हकीगत.



दिनांक २४ जुलै २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता सुमारास वर्सोवा पोलिसांना पोलीस नियत्रंण कक्षामार्फत माहिती मिळाली की, अंधेरी, जे.पी. रोड, सात बंगला, बस डेपो येथे बस डेपोच्या आवारात एक अनोळखी व्यक्ती गंभीर जखमी होवून मृत अवस्थेत पडलेला आहे. ही माहिती मिळताच व.पो.नि. सिराज इनामदार, पो.नि.संग्राम पाटील, स.पो.नि दळवी व पोलीस पथक तातडीने घटनास्थळी पोहचले. घटनास्थळी अंदाजे ...पान २ वर

# परस्त्रीवर तो वाईट नजर ठेऊन फसला लंपट रिक्षा चालक जीव गमावून बसला

जळगाव/क्राईम रिपोर्टर

आपल्या बायकोवर दुसऱ्याची वाईट नजर आहे हे लक्षात आल्यावर कुठलाही पती स्वस्थ बसू शकत नाही. जळगावमध्ये समोरासमोर घरे असलेल्या एका विवाहितेवर समोरच्या घरात राहणाऱ्या रिक्षा चालकाची वाईट नजर होती. तो सतत तिच्याकडे पहात राहायचा. अखेर तिने हि गोष्ट तिच्या पतीला सांगताच चिडलेल्या तिच्या पतीने त्या रिक्षावाल्याची त्याच्या भावासामोरच हत्या केली.





आरोपी विठ्ठल



दिनेश काशिनाथ भोई आणि विठ्ठल तुकाराम हटकर या दोघांची घरे अमोरासमोर होती. रस्त्याच्या इकडे दिनेशचे तर रस्त्याच्या तिकडे विठ्ठलचे घर होते. त्यामुळे साहजीकच दोघा परिवारातील सदस्यांची दररोज नजरानजर होत असे. विवाहीत विठ्ठल हटकर हा सेंट्रींग ठेकेदार होता. ठेकेदारीच्या कामातून मिळालेल्या पैशातून तो आपला व परिवाराचा उदरनिर्वाह चालवत होता. रस्त्याच्या इकडे एकत्र कुटूंबात राहणारा अविवाहीत दिनेश भोई हा रिक्षा चालक होता. रिक्षा हे त्याच्या उत्पनाचे साधन होते. अविवाहीत रिक्षाचालक दिनेशची विवाहीत विठ्ठलच्या पत्नीवर दररोज नजर पडत असे. दोघांच्या घरासमोरुन जाणारा वाहतुकीचा रस्ता निमुळता आणि घरे अगदीच समोर असल्यामुळे साहजीकच अविवाहीत दिनेशची विठ्ठलच्या पत्नीवर नजर पडण्याची घटीका जुळून येत असे. ...पान २ वर

## भावकीतल्या महिलेचे अनैतिक प्रेम चौघांनी केला तिच्या याराचाच गेम

कवठेमंहकाळ/क्राईम रिपोर्टर



मयत संदीप

शरीरसुखाच्या ओढीने निर्माण झालेले अनैतिक संबंध कधी प्राणघातक ठरतील याचा नेम नाही. कारण आपल्या पत्नीचे किंवा कुटुंबातील महिलेचे दुसऱ्या बरोबर अनैतिक संबंध आहेत हे कुणीही सहन करू शकत नाही. अरळहट्टी येथील एका विवाहितेचे त्याच गावातील संदीप नावाच्या तरुणाशी अनैतिक संबंध होते. मात्र हि गोष्ट तिच्या भावकीतील लोकांना सहन झाली नाही आणि तिच्या पतीच्या नात्यातील काही लोकांनी एकत्र येऊन संदीपचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

सांगली जिल्हा हा तसा कर्नाटक सीमेला लागून असणारा जिल्हा होय.त्यामुळे दोन्ही राज्यातील अनेक लोक हे इकडे तिकडे औषध पाण्यासाठी इतर कामासाठी येत असतात. अरळहट्टी हे गाव अथणी तालुक्यातील महाराष्ट्र सीमेला लागून असणारे गाव आहे. अरळहट्टी येथील संदीप आवळेकर याचे गावातीलच अनिल जाधव याच्या घरातील एका महिलेशी प्रेम संबंध असून तो तिच्याबरोबर कायम हिडंत फिरत असतो. ती विवाहित महिलाही संदीपच्या प्रेमात आकंठ बुडालेली होती.ज्यावेळी ही गोष्ट त्या महिलेच्या घरातील लोकांना समजली त्यावेळी तिच्या नवऱ्याने तिला मारहाण ...पान २ वर

# जनार्दनचा खून झाला घरातच दुपारी मुलाच्या हत्येची आईने दिली सुपारी



मयत जनार्दन

नाशिक/क्राईम रिपोर्टर

रक्ताची नाती जेंव्हा त्रासदायक ठरतात, तेंव्हा वैतागलेला माणूस कोणत्याही थराला जाऊन काहीही करू शकतो. अशावेळी रक्ताच्या नात्याला रक्तरंजित करायलाही माणूस मागेपुढे पाहत नाही. नाशिक जिल्ह्याच्या ढेकू खुर्द गावात अशाच एका घटनेत त्रासदायक ठरलेल्या पोटच्या पोराला मारण्यासाठी त्याच्या जन्मदात्या आईनेच १५ हजारांची सुपारी देऊन मुलाचा काटा काढला. मात्र या हत्याकांडाला वाचा फुटताच पोलिसांनी आरोपी आई आणि हल्लेखोर दोघांनाही अटक केली आहे.



नांदगाव तालुक्यातील ढेकू खुर्द गावचे कामगार पोलीस पाटील म्हणून विजय गेमा चव्हाण हे काम पहातात. दि. ७. जुलै २०२२ रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास साईनाथ झब्बू राठोड याने त्यांना फोन करून कळवले की, 'माझ्या ढेकू बंधरा परिसरात असलेल्या शेतातील विहीरीत संशयास्पदरित्या एक गोणी पडलेली आहे, तर तुम्ही ताबडतोब या आणि चौकशी करून खात्री करा.' साईनाथने अशी खबर दिल्याने पोलीस पाटील विजय चव्हाण हे तातडीने घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहोचल्यावर त्यांनी नांदगाव पोलिसांना फोन करून ही माहिती दिली. बोलठाण दूरक्षेत्र येथे कार्यरत असलेले पोलीस हवालदार गांगुर्डे व कॉन्स्टेबल बागुल हेही घटनास्थळी ...पान २ वर

## दागिने लुटण्यासाठी चंपाबाईचा खून केला पळालेला आरोपी टोपीमुळे गजाआड झाला



जयसिंगपुर/क्राईम रिपोर्टर

वृद्ध महिलांनी अंगावर दागिने घालून फिरणे धोकादायक असते. कारण कधी कधी ओळखीच्या लोकांचीच नियत फिरते आणि ते दागिने लुटण्यासाठी त्या वृद्ध महिलेचा जीव घेतात. मात्र खुनी किती जरी चलाख असला तरी घाई गडबडीत काहीना काही पुरावा मागे सोडून जातो. चिंचवाड गावातील चंपा बाईच्या दागिन्यांवर त्याच गावातील प्रकाश नंदीवाले याची नजर होती आणि एके दिवशी गावातील लाईट जाताच त्याला संधी मिळाली आणि त्याने चंपा बाईंची हत्या करून तिच्या गळ्यातील दागिने पळवले. पण गडबडीत त्याची टोपी तिथेच पडली आणि त्या टोपीवरून पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या.

जयसिंगपुर जवळील चिंचवाड येथे नंदीवाले वसाहातीत चंपाबाई भूपाल ककडे या ६५ वर्षीय महिला राहयला आहेत. ...पान ६ वर

# पिता-पुत्राच्या नात्याला रक्ताचा टिळा दारुड्या बापाचा मुलानेच चिरला गळा

गातेगांव/शंकर सोनवणे



दारुडा माणूस हा कुटुंबासाठी एकप्रकारची डोकेदुखी असतो. कारण दारूच्या नशेत रोज घरात भांडण करणे पत्नी व मुलांना शिवीगाळ आणि मारहाण करणे यामुळे कुटुंबातले लोक वैतागलेले असतात आणि याच वैतागातून कधीतरी कुटुंबातील माणूसच दारुड्याच्या जीवावर उठतो आणि त्याचा कायमचा बंदोबस्त करतो. लातूर जिल्ह्यातील गातेगाव येथे दारुड्या बापाच्या त्रासाला मुलगा आणि घरातले लोक इतके वैतागलेले होते कि एकेदिवशी मुलानेच रागाच्या भारत बापाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी हल्लेखोर मुलगा आणि त्याच्या बापाला अटक केली आहे.





दारू पिवून पत्नीला आणी मुलाला दररोज शिवगाळ करत मारहाण करणाऱ्या बापाच्या सततच्या त्रासाला वैतागलेल्या मुलाने मित्राच्या मदतीने बापाचा कायमचा काटा काढल्याची घटना लातूर जिल्ह्यातील गातेगाव पोलिस ठाणे हाद्दीतील चिंचेली (ब.) या गावात घडली आहे. नागनाथ खंडू काळे असे मयताचे नाव आहे. चिंचेली (ब.) येथील पोलिस पाटीलांनी गातेगाव ...पान ६ वर

CMYK

08 TO 14 AUGUST 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 8/6/2022 10:00 PM Page 1



## पान १ वरून....

### नवरदेव फसला दोन लाख...

त्याची नवविवाहित पत्नी आणि तिची आई पळून जाण्याच्या प्रयत्नात होती. दत्तात्रय हसबे यांनी त्या दोघीं विरुद्ध पोलीसंकडे तक्रार नोंदवली आणि पोलिसांनी त्या दोघींना अटक केली. तिघांचा शोध सुरु आहे. विटा जवळील खानापूर तालुक्यातील हिवरे येथीली दत्तात्रय नागेश हसबे याची वयाची ३०शी ओलाडली तरी लगीन गाठ काही जुळत नव्हती. लग्नासाठी त्याने भरपूर प्रयत्न केले होते. त्याच्या घरची आर्थिक परिस्थितीती ही सधन होती. त्याचे शेत घर होते. तरीही त्याचे लग्न काही जमत नव्हते. गेली तीन चार वर्ष तो लग्नासाठी मुली पाहत होता. एक दोन ठिकाणी तर लग्न जमता जमता मोडले होते. त्यामुळे तो काहीसा निराश झाला होता. आपल्या नशिबात लग्नाचे बाशिंग नाही असे तो मनातील मनात म्हणत होता. हल्ली तरी त्याने मुली पाहयला जाणे ही टाळले होते. याचे एकमेव कारण म्हणजे लग्नासाठी मुलीच्या अपेक्षा मुलाकडून जास्त होत्या. बऱ्याचजणांना शेतकरी नवरा नको होता. तर काही जणांनी मुलाचे वय जास्त असल्याचे कारण देवून लग्नाला नकार दिलेला होता. त्यामुळे त्याचेसाठी लग्न करणे म्हणजे एक अग्नीदिव्यच होते. दत्तात्रय हसबे याचा मित्र संजय खिलारे याने त्याला एकदा कर्नाटकातील जुगूळ येथे लग्न जमविणारी त्याच्या ओळखीची महिला असल्याचे त्याला सांगितले. ती लग्न हमखास जमविते पण त्यासाठी तिची फी म्हणून लाख रूपये घेते असे ही तो त्याला म्हणाला होता. संजय यांच्या सांगण्यावर त्याचा विश्वास होता. काही झाले तरी तो त्याचा मित्र होता. तो त्याला फसविणारा नव्हता. खरे तर संजय याला ही दत्ताचे लग्न का जमत नाही याचे कोडे पडले होते. हे कोडे सोडवायचेच असे त्याने दत्ताला सांगितले. संजयने त्या महिलेची माहिती दिल्यावर दत्ता ही त्या महिलेकडे लग्न जमविण्यासाठी जावू या असे म्हणाला. गेल्या महिन्यात त्या दोघांनी बेळगाव जिल्यातील चिकोडी तालुक्यातील जुगूळ येथे त्यांनी त्या महिलेची भेट घेतली. जयश्री गदगे असे तिचे नाव होते. ओळख पाळख झाल्यावर जयश्री हिने ही त्या दोघांना मी आतापर्यंत इतकी लग्ने जमविली आहेत. त्याचेकडून मला त्यासाठी लाख दोन लाख रूपये लग्न जमविताना मिळत असतात. मी लग्न न जमणाऱ्याची लग्ने जमवित असते अशी गोड बोलून त्या दोघांना तिने भुरळ घातली. तिच्या लागवी बोलण्याने ते दोघे ही पाघळले होते. त्या दोघांना ही तिने सोलापूर येथे आपली मैत्रीण प्रियांका शिंदे हिची मुलगी दीपाली शिंदे ही मुलगी असून दत्तात्रय साठी ते योग्य स्थळ असल्याचे सांगीतले. आपण काही करून त्या मुलीसाठी प्रयत्न करतो पण त्यासाठी दोन लाख रूपये दयावे लागतील. शिवाय प्रवास खर्च वेगळा असेल हे तिने त्यांना अगोदरच सांगितले. तिच्या सगळ्या शर्ती अटी दत्तात्रय हसबे आणि संजय खिलारे यांनी मान्य केल्या. हे स्थळ निपाणी येथील सुनिल दत्तात्रय शहा याना माहित आहे आपण त्यासाठी त्याची भेट घेवू असे जयश्री गदगे हिने सांगितल्यावर ते दोघे ही तिला घेऊन निपाणी येथे आले. जयश्री हिने त्या दोघांची भेट शहा याचेसोबत घालून देण्याअगोदर तिने शहा यांना मालदार पार्टी असल्याचे सांगून दीपालीचे लग्नाचे स्थळ दाखवूया असे सांगितले. संजय शहा यांनी ही या स्थळाला हिरवा कंदील दाखविल्यावर धन्नम्मा उर्फ धानुबाई नागनाथ बिराजदार हिला घेऊन ते चौघे सोलापूरला मुलगी पाहण्यासाठी गेले. पण त्या पूर्वी या चौघांनी दीपालीची आई प्रियांका हिच्याशी संपर्क करून मुलगी दाखविण्याची विंनती केली. पहिल्यांदा जयश्री हिने दीपाली शिंदे हिचा फोटो त्याना मोबाईल दाखविला. तिचा फोटो पाहून दत्तात्रय खुश झाला. कारण फोटोत दीपाली ही सुंदर तर दिसत होती. पण तिचे आरसपाणी सौदर्य पाहून खरे तर तो घायाळ झाला. त्यामुळे लग्नासाठी तो गुडघ्याला बाशिंग बांधून बसल्याचे जयश्री गदगे हिच्या लक्षात आले. म्हणून तर तिने एका पेक्षा एक डिमांड त्या दोघाच्यापुढे ठेवले. सगळे काही मनासारखे जुळून आल्यावर मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम पार पडला. मुलीला मुलगा व मुलग्याला मुलगी पंसत आल्यानंतर चट्ट मंगनी और पट ब्याह असे करण्याचे ठरले. खरे तर या पाच जणांची साखळीच होती हे दत्तात्रय आणि संजय याच्या लक्षात आले नाही. लग्न जमवित असताना जयश्री गदगे हिने सांगितल्या प्रमाणे दत्तात्रय हसबे याने त्यांना १ लाख ७५ हजार रूपये दिले. इतके पैसे मिळाल्यानंतर जयश्री हिने दीपाली शिंदे व तिची आई प्रियांका शिंदे यांना त्यातील ठरलेली रक्कम दिली. त्यानंतर जयश्री हिने एंजट सुनिल शहा व धन्नम्मा बिराजदार याना ७० हजार रूपये दिले. हे सगळे पैसे दत्तात्रय याने त्याना ऑनलाईन दिले होते. ठरल्याप्रमाणे प्रत्येकाला वाटा मिळाला असल्याने प्रियांका शिंदे यांनी सोलापूर हून दि.२७ जुलै रोजी मुलगी दीपाली हिला घेऊन मुलाचे घरी म्हणजे हिरवे येथे आली. दोन दिवसात लग्नाचा विधी पार पाडायचा असल्याने मुलीकडच्या लोकांची आणि जयश्री गदगे याची व्यवस्था त्याने गावात चोख केली होती. लगीन घाई हसबे याच्या घरात जोरात चालू होती. एकदाचे लग्न जमले म्हणून दत्तात्रय हा मनातून खुश होता. लग्नासाठी त्याने आपल्या जवळच्या पाहुण्यांना व मित्रांना निमंत्रण दिले होते. त्याच रात्री त्या दोघांचे लग्न पार पडले. दीपाली आणि दत्तात्रय यांनी सात जन्माच्या गाठी बांधल्या होत्या. पण खरे तर हे आळवावरचे पाणी होते. दोन दिवसात पुजा अर्चा झाली. तसे जयश्री गदगे यांनी तेथून काढता पाय घेत प्रियांका शिंदे व दीपाली हिला खुणविले व इशारा केला. त्या दोघीनी तिचा इशारा ओळखला तसे त्या दोघींनी पुढच्या नाटकाची तयारी केली. दि.३० जुलै रोजी प्रियांका शिंदे या मुलगी नववधु दीपाली हिला घेऊन तिला कपडे घ्यावयाचे आहेत म्हणून भिवा घाटात आली.त्याचे सोबत त्यावेळी दत्तात्रय व त्याचे नातेवाईक ही होते.या दरम्यान प्रियांका यांनी दीपालीला घेऊन पळ काढत असताना दत्तात्रय याने त्याना लग्न झाले आहे आणि तुम्ही कुठे जात आहात असे विचारले असता प्रियांका शिंदे यांनी त्यांना माझ्या मुलीचे लग्न आधीच झाले आहे. आम्हाला तुमच्या सोबत तिचे लग्न लावून देण्यासाठी पैसे मिळाले आहेत. आधी लग्न झाले असताना तुम्ही आम्हाला का फसविलात असे दत्तात्रय आणि त्याच्या नातेवाईकांनी त्या दोघीना विचारले. त्यावेळी त्याच्या वादावादी ही झाली. दत्ताचे नातेवाईक तर त्या दोघींना मारण्यासाठी त्याचे अगांवर जात असताना प्रियांका शिंदे यांनी तुम्ही आमच्या अंगावर आलात तर आम्ही तुमच्या विरोधात पोलीसात तक्रार करू अशी धमकी दिली. भिवाघाटातून त्या दोघी कपडे खरेदी करण्याच्या बाहण्याने पळून सोलापूरला जात होत्या. रागाच्या भरात दत्तात्रय हसबे याने पत्नी दीपाली हिला याबाबत विचारले असता आपल्याला खोटे लग्न करण्यासाठी २० हजार रूपये मिळाल्याचे तिने सांगितले. आपली फसगत झाली आहे हे दत्ताच्या लक्षात येताच त्याने तातडीने विटा पोलीसात तक्रार दाखल केली. त्याने पळून जाणाऱ्या माय लेकीना विटा पोलीस स्टेशनला आणले. विटा पोलीसांनी प्रियांका शिंदे व दीपाली शिंदे याच्याकडे याबाबत चौकशी केली असता त्यांनी कर्नाटकातील जुगूळ येथील जयश्री गदगे या महिलेने खोटे लग्न करण्यासाठी पैसे दिल्याचे सांगितले. आम्हाला हे लग्न मान्य नव्हते आणि नाही असे त्यांनी पोलीसांना सांगितल्यावर पोलीस ही या खोटी लग्नाची बतावणी ऐकून चक्रावून गेले. दतात्रय नागेश हसबे याने दिलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी या प्रकरणी मुलीची आई प्रियांका विकास शिंदे (वय ४०) व मुलगी दीपाली विकास शिंदे (वय २१) रा.दोघी ही सोलापूर याना ताब्यात घेतले. त्या दोघीकडे पोलीसांनी अधिक चौकशी केली असता या सगळ्या प्रकरणाची सुत्रधार बेळगाव जिल्यातील चिकोडी तालुक्यातील जुगूळ येथील जयश्री गदगे, निपाणी येथील सुनिल दत्तात्रय शहा व धान्नम्मा उर्फ धानुबाई नागनाथ बिराजदार हे असल्याचे पुढे आले. दत्तात्रय हसबे याच्या फिर्यादीवरून विटा पोलीसात या सर्वाच्या विरोधात पैसे घेऊन खोटे लग्न लावून फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला. प्रियांका शिंदे व दीपाली शिदे यांना पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्याना आधिक चौकशी साठी मा.न्यायालयासमोर उभे केले असता, मा.न्यायालयाने दोघीना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेतील इतर तिघांचा पोलीस कसोशीने शोध घेत आहेत. पोलीसांनी पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या चौकशीत प्रियांका शिंदे या मुलगी दीपाली हिला लग्नासाठी बऱ्याच जणांना दाखवित होत्या. त्यासाठी त्या येणाऱ्या मुलाकडून एंजट जयश्री गदगे याच्या मार्फत पैसे उकळीत होत्या. दीपाली बरोबर लग्न लावून देतो असे त्या सांगत होत्या. या पाच जणांची खोटे लग्न जमविण्याची एक साखळीच होती. दीपाली खरे तर एक प्यादे होती. तिचे लग्न झालेच नव्हते. त्या दोघी खोटेच लग्नाची बतावणी करून लोकांना फसवित होते, एवढे मात्र खरे!

### मुलगी झाली म्हणून बापानेच ...

नेवून पुरले. दरम्यान या शेतात काम करणाऱ्या एका मजूर महिलेला शेतात काहीतरी हालचाल दिसली म्हणून तिने शेतात काम करणाऱ्या इतर लोकांना गोळा केले आणि त्या ठिकाणी जाऊन पाहिले तेंव्हा आतून रडण्याचा हलका आवाज येत होता. त्यामुळे ताबडतोब तो खड्डा उकरण्यात आला असता आत चादरीत गुंडाळलेले स्त्री जातीचे एक अर्भक आढळले. त्याला बाहेर काढून पोलिसांना कळवण्यात आले. तशी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि ॲम्ब्युलंस बोलावली. त्यानंतर त्या अर्भकाला रुग्णालयात पाठवण्यात आले आणि ॲम्ब्युलंसमधेच बालिकेवर उपचार सुरु करून तिचे प्राण वाचवण्यात आले. सध्या या बालिकेवर हिम्मत नगर मधील प्राथमिक रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून त्या बालिकेच्या पालकांचा शोध घेतला आणि त्या दोघांना काडी तालुक्यातील डांगरवाड गावातून ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपला गुन्हा कबुल केला आहे. मात्र दुसरे आपत्य पोसायची ऐपत नसल्याने आपण मुलीला पुरले असे आता ते सांगत आहेत. पण गांधी नगर सारख्या राजधानीच्या शहरात राहणाऱ्या या दांपत्याची आर्थिक स्थिती अगदीच वाईट नाही. त्यामुळे आर्थिक स्थितीचे ते जे कारण सांगत आहेत ते खोटे असून केवळ मुलगी झाली म्हणून तिला पुरण्यात आले. जर मुलगा असता तर त्यांनी त्याला जिवंत पुरले नसते असे पोलिसांचे आणि या भागातील लोकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या दांपत्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

### घराबाहेर पडताच आयुष्यातून ...

भंडारा जिल्ह्यातील सामुहिक बलात्कार प्रकरणी पीडितेची प्रकृती गंभीर असून सध्या पीडित महिलेवर नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पीडित महिला ही तिच्या पतीपासून विभक्त राहत असून नकुतीच गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव येथे बहिणीकडे राहत होती. दरम्यान ३० जुलैला बहिणासोबत भांडण झाल्याने तिने रात्रीच्या सुमारास घर सोडले. त्यानंतर भंडारा जिल्ह्यात आईकडे जाणासाठी ती घरातून निघाली. घरातून बाहेर निघाल्यानंतर प्रथम दर्शनी संशयित आरोपीने तिला घरी सोडण्याच्या बहाण्याने कारमध्ये बसवले. त्यानंतर गोंदिया जिल्ह्याच्या मुंडीपार जंगलात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तर दुसऱ्या दिवशी ३१ जुलैला पळसगांव जंगलात नेऊन अत्याचार केला. यानंतर आरोपींनी या महिलेला जंगलातच सोडून दिले आणि पळ काढला. या पाशवी अत्याचारानंतर पीडिता जंगलातून निघून लाखनी तालुक्यातील कन्हाळमोह येथे पोहचली. याठिकाणी असलेल्या धर्मा ढाब्यावर पोहचली असता तिथे तिची दुचाकी दुरुस्त करणाऱ्या आरोपी सोबत भेट झाली. तिथे त्यानेही घरी सोडून देण्याच्या बहाण्याने महिलेची फसवणूक केली आणि त्याच्या मित्रासोबत १ ऑगस्टला अत्याचार केले. या अत्याचारांनंतर कारधा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या कन्हाळमोह गावाच्या पुलाजवळ सकाळी ८ वाजेच्या सुमारास महिलेला विवस्त्र अवस्थेत सोडून आरोपींनी पळ काढला. ही पीडित महिला नागरिकांना दिसताच पोलिसांनी महिलेला भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणी केली असता महिलेवर अत्याचार झाल्याचे उघडकीस आले. महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला पुढील उपचारांकरिता नागपुरातील वैद्यकीय महाविद्यालयात हलविले आहे. पीडितेने दिलेल्या माहितीनुसार भंडारा जिल्ह्याच्या कारधा पोलिसांनी दोन संशयित आरोपींना अटक केली आहे. या आरोपींविरुद्ध कलम ३७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास कारधा पोलिस करीत आहेत. या संपूर्ण गुन्हात ३ संशयित आरोपींचा समावेश आहे, सध्या २ आरोपींना भंडारा पोलिसांनी अटक केली असून त्यांना ८ ऑगस्ट पर्यत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्हाची सुरुवात गोंदिया जिल्ह्याच्या गोरेगाव येथे झाल्याने भंडारा पोलिसांनी गोरेगाव पोलिसांना २ संशयित आरोपींसह गुन्हाचा तपास वर्ग केला आहे. हे दोन संशयित आरोपी गोरेगाव पोलिसांच्या ताब्यात असून आणखी एका अज्ञात फरार आरोपीचा शोध गोंदिया पोलीस घेत आहे. तसेच संपूर्ण तपास हा गोंदिया पोलीस करत आहेत.

### गांजा वरून दोघांमध्ये भांडणे ...

२५ वर्षे वयाचा तरुण गंभीर जखमी होवून मृत अवस्थेत पडलेला मिळून आला. मृतदेहाचे बारकाईने निरक्षण केले असता मृत व्यक्तीच्या शरीरावर डोक्याला अनेक जखमा असल्याचे दिसून येत होते. पोलीस मृतक व्यक्ती आणि आरोपींची ओळख पटवण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत होते. तसेच आरोपीची ओळख पटवण्यासाठी फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकाची मदत घेण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये चौकशी केली असता, मृत तरुणाचे नांव सुरज मनोज तिवारी (वय २४) असल्याचे समजले. सूरज हा सुमारे दिड वर्षापुर्वी दिल्ली वरुन मुंबईत आला होता. तो रस्त्यावर संगीत वाजवत होता. त्याला कुठलाही कामधंदा नसल्याने तो सातबंगला, अंधेरी पश्चिम, मुंबई परिसरातच गुरुदवारामधील लंगर अथवा इतर मोफत जेवण मिळणाऱ्या ठिकाणी जावून जेवत असे व फुटपाथ किंवा बी.एस.टी बस डेपोच्या आवारात झोपत असे. त्यामुळे त्याला काही टेन्शन नव्हतं. मोफत जेवण आणि झोपायला मुक्त जागा मिळाल्याने त्याला दारु व गांजा पिवून नशा करण्याची सवय होती. तो दररोज नशा करुन इतर तीन साथीदारा सोबत बस डेपामध्ये झोपत असे. अशी माहिती प्राप्त झाली. मात्र त्याचा खून कोणी केला याबाबत कुठलीही माहिती मिळाली नाही. पोलीस या खुनाचा तपास करत होते, मात्र कुठलाही धागा दोरा मिळून येत नव्हता. परंतु त्याच्यासोबत असणाऱ्या साथीदारांकडे अधिक चौकशी केली असता, मोनू नावाच्या साथीदाराने त्याचा खून केला असून तो पळून गेला आहे अशी माहिती पोलिसांना मिळाली. परंतू मोनू हा काही दिवसापूर्वीच याठिकाणी आला होता. त्यामुळे त्याचे पुर्ण नांव अथवा त्याचा पत्ता कोणालाही माहित नव्हता. मोनू यास गांजा पिवून नशा करण्याची सवय होती. या माहितीच्या आधारे मोनुचा शोध घेण्यासाठी परिमंडळ - ९चे पोलीस उपायुक्त मंजुनाथ सिंगे व सहा. पोलीस आयुक्त ज्योत्सना रासम यांचे मार्गदर्शनाखाली चार पोलीस पथके तयार करण्यात आली. ही पथके मुंबईतील वेगवेगळया ठिकाणी पाठवून गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी मोनू याचा शोध सुरू करण्यात आला. शेवटी बारा दिवसांच्या अथक परिश्रमानंतर आरोपी मोनू यास पकडण्यात वर्सोवा पोलीस ठाणेच्या पथकास यश आले. पोलीस ठाण्यात आणून त्यांची चौकशी केली तेव्हा त्याने त्याचे पुर्ण नांव मोनूकुमार शिवनारायण सिंग (वय २२) रा. फरिदाबाद, राज्य हरियाणा येथील रहिवासी असल्याचे पोलिसांना सांगितलं. परंतू तू सूरज तिवारीचा खून का केला असा प्रश्न विचारला तेव्हा त्याने पोलिसांना वेगळी माहिती दिली. मृतक सुरज तिवारी हा सुमारे दिड वर्षापुर्वी दिल्ली वरुन मुंबईत आला होता. तो रस्त्यावर संगीत वाजवत होता. अंधेरीच्या चार बंगला परिसरातच गुरुदवारामधील लंगर अथवा इतर मोफत जेवण मिळणाऱ्या ठिकाणी जावून जेवत असे व फुटपाथ किंवा बी.एस.टी बस डेपोच्या आवारात झोपत असे. मोनूकुमार सिंग हा देखील फुटपाथवर राहणारा होता. त्यामुळे या दोघांची ओळख झाली. दोघांनाही नशा करायची सवय होती. दिनांक २३ जुलै रोजी रात्री हे दोघे अंधेरी चार बंगला बेस्ट बस डेपोच्या आवारात गांजा पित बसले होते. गांजा पिण्यावरून या दोघात वाद झाला. नशेत असलेले दोघेही एकमेकांना शिवीगाळ करू लागले. मोनुला ते सहन झाले नाही. शेवटी रागाच्या भरात मोनुने जवळच पडलेला पेव्हर ब्लॉक उचलला. तो सूरज तिवारीच्या डोक्यात घातला. डोक्याच्या मागील बाजूस झालेल्या दुखापतीमुळे त्याचा मृत्यू झाला. अशी धक्कादायक कबुली त्याने दिली. पोलिसांनी त्याला ५ आगस्ट रोजी अटक करून त्याच्या विरोधात वर्सोवा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्रमांक ४५३/२०२२ कलम ३०२ भा.द.वि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे .वर्सोवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिराज इनामदार हे गुन्ह्याचा आधीक तपास करत आहेत.

### परस्त्रीवर तो वाईट नजर ...

नजर पडल्यावर विठ्ठलच्या पत्नीकडे दिनेश कमी अधिक प्रमाणात निरखून बघत असे. हा रोजचा प्रकार विठ्ठलच्या पत्नीला आवडत नव्हता. त्यामुळे हा प्रकार ती पती विठ्ठलच्या कानावर घालत असे. त्यामुळे विठ्ठल आणि दिनेश यांच्यात वादाची ठिणगी पडत होती. गेल्या काही वर्षापासून दिनेश यास मानसिक आजार बळावला होता. तो एकलकोंडा रहात होता. तो घरीच रहात असल्यामुळे विठ्ठलच्या पत्नीवर त्याची नजर पडण्याची वारंवारीता साहजीकच वाढली होती. मानसिक आजार बळावल्यामुळे दिनेशने रिक्षा चालवणे सोडून दिले होते. तो घरीच रहात होता. दरम्यान आपल्याकडे दिनेश सारखा टक लावून बघत असल्याची तक्रार विठ्ठलची पत्नी विठ्ठलकडे करत होती. त्यामुळे विठ्ठलची मानसिकता बिघडली होती. हटकर आणि भोई या दोन परिवारात तणाव निर्माण झाला होता. या तणावातून विठ्ठलने दिनेश यास जीवे ठार करण्याची धमकी दिली होती. दिनेशचा भाऊ रमेश याला देखील विठ्ठलने तुझ्या कुटूंबाला संपवून टाकेन अशी धमकी दिली होती. या धमकीला घाबरुन दिनेशने मानसिक धसका घेतला. त्यामुळे दिनेश व रमेश या दोघा भावांनी विठ्ठलविरुद्ध रामानंद नगर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली. आपल्याविरुद्ध तक्रार दाखल केल्याचे समजल्यानंतर विठ्ठलच्या रागाचा पारा अजूनच चढला. आता दिनेश यास कायमचे संपवून टाकायचे या उद्देशाने विठ्ठल तयारीला लागला. २३ जुलै रोजी रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास दिनेशचा भाऊ रमेश आपल्या मित्रांसोबत उभा होता. त्यांच्यासोबत दिनेश देखील उभा होता. त्याचवेळी विठ्ठल हा त्याच्या ताब्यातील दुचाकीने त्यांच्याजवळ आला. काही अंतरावर दुचाकी उभी करुन विठ्ठल त्यांच्याजवळ येताच त्याने कोयत्याने दिनेशच्या डोक्यात सपासप वार केले. हा प्रकार बघून दिनेश व रमेश या दोघा भावांचे मित्र पळून गेले. रमेशने विठ्ठल यास प्रतिकार केला. मात्र विठ्ठलने रमेशच्या पोटात लाथ मारुन त्याला खाली पाडले. पुढच्याच क्षणी विठ्ठलने दिनेशच्या डोक्यात वार करुन तो त्याची गाडी तेथेच सोडून पळून गेला. जखमी अवस्थेत दिनेश जमीनीवर पडल्याचे बघून त्याचा भाऊ रमेश जोरजोरात ओरडू लागला. त्याला रामानंद नगर पोलिस स्टेशनला आणले गेले. या घटनेची माहिती पोलिस स्टेशनला देण्यात आली. पोलिसांनी मेडीकल मेमो दिल्यानंतर जखमी दिनेश यास सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी दिनेश यास मयत घोषित केले. दिनेशच्या हत्येप्रकरणी विठ्ठल याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने पळून जाण्याच्या बेतात असलेल्या विठ्ठल यास शिताफीने ताब्यात घेत रामानंद नगर पोलिसांच्या ताब्यात दिले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक विजय शिंदे करत आहेत.

### भावकीतल्या महिलेचे अनैतिक ...

करून संदीप बरोबर असणारे तिचे प्रेमसंबंध तोडण्यास सांगितले होते. परंतु तिने तसे न करता ती परत परत संदीपला भेटत होती. ते दोघे ही त्या कामासाठी एकत्र असल्याने लवकरच त्या दोघांच्यात शारीरिक संबंध ही निर्माण झाले होते. त्यामुळे त्या महिलेला संदीपच्या त्या सुखाची ओढ लागलेली होती. म्हणून ती त्याला भेटून त्याच्याकडून ते सुख ओरबाडून घेत होती. संदीप ही त्या महिलेचा नाद सोडयला तयार नव्हता. त्या दोघांच्या प्रेमसंबंधाची चर्चा गावात होऊ लागल्यावर ही चर्चा त्या महिलेच्या पतीच्या कानावर ही आली होती. त्यामुळे तिचा नवरा दारूच्या नशेत येऊन तिला मारहाण करीत शिवीगाळ करीत होता. तिला त्याचेबरोबर असणारे संबंध तोडण्यास सांगत होता.

बायकोच्या बाहेरख्याली वागण्याने तो अधीच चिडलेला होता. तिच्यामुळे गावात आपली अब्रु गेली आहे, आपल्याला गावात तोंड दाखवायला जागा उरली नाही. असे त्याचे मत झाले होते. त्याच्या भावकीतील अनिल जाधव याला त्याने आपल्या मनातील गोष्ट बोलून दाखविली होती. त्याला ही त्याचे बायकोचे संदीप बरोबर असणारे प्रेमसंबंध माहित होते.तो ही या कारणातून संदीपवर चिडून होता. अरळकट्टी गावात संदीप आणि त्या महिलेच्या प्रेमसंबंधाची चर्चा रंगत असताना अनिल जाधव याने संदीप याला भेटून त्या महिलेचा नाद सोड नाही तर याचे परिणाम वाईट होतील अशी धमकी वजा इशारा दिला होता.पण संदीप याने त्याच्या या धमकीकडे सोईस्कर रित्या दुर्लक्ष करीत तुला काय करायचे ते कर जा. ती माझी आहे,आणि मी तिचा आहे.आणि माझ्या प्रेमप्रकरणात पडणारा तू कोण? ती काय तुझी बायको आहे का? असे उलट विचारले होते. त्यामुळे जाधव आणि संदीप याच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गावात जाधव कुंटूंब हे प्रतिष्ठीत असल्याने संदीप याने त्याच्या घरातील महिलेशी ठेवलेले संबंध त्याना खपत नव्हते. काही करून तो ही ऐकत नाही आणि ती ही ऐकत नाही म्हणून त्या महिलेला नादाला लावणाऱ्या संदीपचीच गेम करायचीच असे अनिल जाधव याने ठरविले होते. त्याने याबाबत आपला चुलत भाऊ आकाश उर्फ भैय्या जाधव याला बोलून दाखविली होती. आकाश ही संदीपवर चिडूनच होता. ती महिला ही आकाशची नात्याने वहिनी लागत होती. त्यामुळे भावकीतला हा प्रश्न सोडवायचा तर अनिल याला साथ दयायचे असे त्याने ही ठरविले होते. संदीप याचा काटा काढयाचे तर तशी तयारी केली पाहिजे म्हणून आकाश याने हातकणंगले तालुक्यातील तारदाळ येथील आपला पाहुणा रामु इंगळे व सांगली येथील हनुमान नगर येथे राहणारा सागर जाधव यांना ही हाताशी धरले. ते ही संदीप याची गेम करायला आकाश याला मदत करण्यास तयार झाले. हे चौघे ही आता आकाश आवळेकर याच्या पाळतीवर राहीले होते. तो कधी कुठे जातो याची ते वाट पाहत होते. ते चौघे ही संधीच्या शोधात असताना तशी संधी त्या चौघांना बुधवार दि.३ ऑगस्ट रोजी मिळाली. संदीप हा आपला मित्र दिनकर जाधव याला सोबत घेऊन सलगरे येथे दवाखान्यात आला होता. रात्री ८ च्या दरम्यान तो आणि त्याचा मित्र दिनकर जाधव हे दोघे ही मोटार सायकलीवरून सलगरे येथून दवाखान्यातून उपचार घेऊन अरळहट्टी येथे जात होते. त्याच वेळी त्याचा पाठलाग करीत दोन मोटार सायकलीवरून चौघे जण आले. सलगरे अरळहट्टी रस्त्यावर ते अरळहट्टीच्या एक दोन किमी जवळ आले असताना पाठीमागून येणाऱ्या दोन मोटार सायकलीवरून येणाऱ्या तरूणांनी संदीप याच्या मोटार सायकलीच्या आडवी आपली मोटार सायकल घातली. ही मोटार सायकल त्याचा मित्र दिनकर जाधव हा चालवित होता. तर संदीप हा त्याच्या मागच्या सीटवर बसला होता. पाठीमागून आलेल्या तरूणांनी त्याची मोटार सायकल आडवून कुणाला काही समजण्याच्या आतच त्यांनी संदीपच्या मानेवर आणि डोक्यावर आपल्याकडील कोयत्याने वार करीत जखमी केले.तसे ते दोघे ही खाले पडले. ते चौघे ही खाली पडलेल्या संदीपवर कोयत्याने सपासप वार करीत असताना त्याचा वार चुकवून संदीप हा त्याच्या तावडीतून निसटून आरळहट्टीच्या दिशेने पळू लागला. तसे त्यांनी त्याचा पाठलाग करीत गाठले. आकाश जाधव आणि भैय्या जाधव यांनी त्या गाठून परत त्याचेवर वार करीत असताना संदीप हा ओरडत मला मारू नका, मला सोडा, मी तिचा नाद सोडतो असे म्हणत होता. पण मारेकऱ्याच्या डोक्यात आग संचारली असल्याने त्याने त्याला दाय माय न दाखविता त्याचेवर वार करीतच सुटले होते. तसा तो रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर पडला. त्याला सोडवायला दिनकर जाधव हा येत असताना आकाश याने आपल्याकडील कोयता त्याला दाखवित त्याला या प्रकरणापासून लांब राहण्यास सांगितले. इकडे त्यांनी केलेल्या हल्ल्यात संदीप आवळेकर हा जागीच गतप्राण झाला होता. त्याला मारून मारेकऱ्यांनी अरळीकट्टीच्या दिशेने पळ काढला होता. या घटनेची माहिती अरळहट्टी गावात समजातच मयत संदीप याच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. ही घटना कुणी आणि कोणत्या कारणासाठी घडवून आणली हे दिनकर जाधव याला चांगल्या प्रकारे माहिती होते. तो या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार होता. कुणी तरी या घटनेची माहिती कवठेमहंकाळ पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी पोहचले होते. घटनास्थळी रस्त्याच्या कडला रक्ताच्या थारोळ्यात संदीप याचा मृतदेह पडला होता. त्याचे डोक्यावर आणि मानेवर धारदार हत्याराने वार केल्याचे दिसून येत होते. पोलीसांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कवठेमहंकाळ येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत संदीप याचा मित्र दिनकर जाधव यांच्याकडून घेतली. तो मारेकऱ्याना ओळखत असल्याने त्यांची नावे त्याने पोलीसांना सांगितली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीस मारेकऱ्याचा शोध घेत असताना मारेकरी हे घटनास्थळावरून आरळकट्टीच्या दिशेने पळून गेल्याचे दिनकर याने पोलीसाना सांगितले. या घटनेचा तपास कवठेमहंकाळ पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीस ही करीत होते. त्यांनी कर्नाटक पोलीसांच्या मदतीने आरळहट्टी जाऊन या घटनेतील आकाश उर्फ भैय्या जाधव आणि अनिल जाधव याना ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी ही घटना कोणत्या कारणातून केली याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेतील इतर दोघा आरोपीची माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहिती वरून स्थानिक गुन्हे अन्वेषनाच्या पोलीसांनी या घटनेतील रामु इंगळे याला इचलकरंजी जवळील तारदाळ येथून तर सागर जाधव याला सांगली येथून ताब्यात घेतले. त्याचेकडे ही पोलीसांनी अधिक चौकशी केली असता त्यांनी ही आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची फिर्याद कवठेमहंकाळ पोलीसांनी मयत संदीप याचा मित्र दिनकर जाधव याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून संदीप रामराव आवळेकर (वय ३३) याच्या खून प्रकरणी आकाश उर्फ भैय्या माणिक जाधव (वय २३) अनिल बापू जाधव (वय २८) रामू नायकू इंगळे (वय १९) आणि सागर सदाशिव जाधव (वय २३) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्यांना कवठेमहंकाळ येथील मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कोयता व दोन दुचाकी गाडया जप्त केल्या होत्या.या घटनेचा तपास पोलीस उपाधिक्षक रत्नाकर नवले, पो.निरी.जितेंद्र शहाणे याच्या मार्गदर्शनाखाली कवठेमहंकाळ पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पोलीसांनी करून घटनेनंतर काही तासातच यातील गुन्हेगारांना जेरबंद केले. या घटनेचा पुढील तपास स.पो.नि. सागर गोडे हे करीत आहेत. विवाहबाहय संबंधात अडकलेल्या महिला व पुरूषांना या संबंधात मजा आणि आनंद वाटत असतो. परंतु ज्यावेळी असे संबंध उघड होतात त्यावेळी त्यातून खुनासारखी अनर्थ ठरणारी घटना घडते एवढे मात्र खरे...!

### जनार्दनचा खून झाला घरातच...

दाखल झाले. साईनाथ झब्बू राठोड यांच्या शेतातील विहीरीजवळ सर्व जण पोहोचले. सर्वांनी विहीर आणि परिसराची पहाणी केली असता शेतातील विहीर पाण्याने पूर्ण भरलेली होती. निळ्या रंगाची गोणी विहीरीच्या पाण्यात तरंगत होती. पोलीस पाटील व पोलिसांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या मदतीने ती गोणी विहीरीतून बाहेर काढली. त्या गोणीमध्ये काय आहे? याची पहाणी केली असता त्यांना माणसाचे पाय दिसले, त्यामुळे पोलिसांनी लगेच ही माहिती नांदगाव पोलीस ठाण्याला कळवली. घटना गंभीर असल्याचे पाहून पोलीस निरीक्षक रामेश्वर गाडे पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले. दोघा पंचांसमक्ष गोणीचा पंचनामा करून गोणीचे तोंड फाडून गोणीमध्ये असलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. तो मृतदेह गावातील लोकांनी लगेच ओळखला, कारण तो त्याच गावातील जनार्दन आप्पा पेंढारे याचा असल्याचे आढळून आले. घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह पीएम साठी नांदगाव येथील शासकीय रूग्णालयात पाठवण्यात आला. गोणीत मिळून आलेल्या जनार्दन आप्पा पेंढारे याचा खून करण्यात आला होता. गोणीत त्याचा मृतदे विहीरीत फेकून देवून पुरावा नाहीस करण्यात आला होता. गुन्हा गंभीर असल्याने पोलिसांनी चौकशीला प्रारंभ केला. चौकशी करत असतांन पोलिसांना महत्त्वाची माहित मिळाली आणि पोलिसांनी समाधान दौ नांदगाव हल्ली रा. ढेकू, ता. नांदगाव) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलिसांनी चौकशी करायला सुरुवात केली. त्याच्या अंगावरील पेंटवर काही ठिकाणी रक्ताचे डाग पडलेले दिसून आले, त्यामुळे गुन्ह्याचा संशय त्याच्यावरच बळावला होता. पोलिसांनी प्रश्नांचा भडीमार करत समाधानची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली देत केलेल्या गुन्ह्याची सर्व हकीकत सांगितली. दि. ७ जुलै २०१२ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास समाधान भड याला जनाबाई अप्पा पेंढारे हिने तिच्या घरी बोलावले. जनार्दन आप्पा पेंढारे हा या जनाबाईचा मुलगा होता. तिने समाधानला सांगितले की, 'माझा मुलगा जनार्दन हा आम्हाला खूप त्रास देतो. त्याच्याकडून होणारा त्रास आता काही सहन होत नाही. मी तुला १५ हजार रुपये देते. जनार्दन याचा कायमचा काटा काढून टाक. त्याचा खून करून टाक म्हणजे आमची कायमची सुटका होईल. त्यास समाधान लगेच तयार झाला त्याने जनार्दनचा खून करण्यास होकार देताच जनाबाईने त्याला १५ हजार रुपये दिले.

अशा तऱ्हेने जनाबाईने स्वतःच्या मुलाचा खून करण्याची सुपारी समाधान यास दिली. पैसे घेवून समाधान कामाला लागला. जनार्दन हा त्यावेळी घरातच होता. त्याच्या घरात पडलेली लोखंडी पहार त्याने हातात घेतली आणि क्षणात जनार्दनच्या डोक्यात पहार मारुन त्याला जीवे ठार मारले. घरात सर्वत्र रक्त उडाले. त्याच्या पँटवर रक्ताचे शिंतोडे उडाले. फक्त १५ हजाराची सुपारी घेतलेल्या समाधानने जनार्दनच्या डोक्यात पहारीने वार करून त्याचा निर्घृणपणे खून केला. त्यानंतर त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याची तयारी सुरू करण्यात आली. समाधान व जनाबाई या दोघांनी मिळून जनार्दनचा मृतदेह निळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या गोणीमध्ये भरला. गोणीचे तोंड शिवून ती गोणी समाधान व जनाबाई या दोघांनी मिळून उचलून समाधानकच्या मोटार सायकलवर ठेवली. गोणी दोरीने बांधून घेवून मोटरसायकलवर बसून तो घरातून बाहेर पडला. त्यानंतर त्याने ती गोणी ढेकू खुर्द शिवारातील साईनाथ राठोड याच्या शेतातील विहीरीजवळ असलेल्या मोकळ्या जागेत टाकली. मात्र त्याठिकाणी कोणीतरी दोन माणसे येत असल्याचे पाहून समाधान ती माणसे जाईपर्यंत बाजूला जावून उभा राहिला. थोड्या वेळाने ती माणसे निघून गेल्यावर समाधान हा पुन्हा त्याठिकाणी आला आणि जनार्दनचा मृतदेह असलेली गोणी विहीरीत टाकून दिली. गोणीला बांधलेला दोर हा जवळ असलेल्या बाभळीच्या झाडाजवळ फेकून दिला व तो त्याच्या घरी निघून गेला. समाधानने पोलिसांना कबुली दिल्यावर पोलिसांनी जनार्दनची आई जनाबाई आप्पा पेंढरे हिलाही ताब्यात घेतले. तिने पण गुन्ह्याची कबुली दिली. जनार्दन आप्पा पेंढारे हा मानसिक आजाराने त्रस्त होता, त्यामुळे तो विक्षिप्तपणे वागत होता. त्याचा जनाबाईला खूप त्रास होत होता. त्याच्या मानसिक विकृतपणापासून कायमची सुटका होण्यासाठी आपण समाधान दौलत भड यास १५ हजाराची त्याचा खून करण्याची सुपारी दिली होती. ही कबुली जनाबाईने दिल्यावर नांदगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून जनाबाई व समाधान भड या दोघांना अटक केली. पोलीस पाटील विजय गैमा चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून समाधान दौलत भड व जनाबाई आप्पा पेंढारे या दोघांवर गुन्हा रजि. नं. २०१/२०२२ भा.दं.वि. कलम ३०२, २०१ व ३४ कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक सचिन पाटील, उपअधीक्षक समीर साळवे, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत खांडवी याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामेश्वर गाढे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरखडकर, पाटील, पोलीस उपनिरीक्षक वाघमारे, हवालदार सांगळे, गांगुर्डे व पोलीस कॉन्स्टेबल बागुल, पवार यांनी गुन्ह्याचा छडा लावून काही वेळातच आरोपींना गजाआड केले. मुलगा त्रास देतो म्हणून मातेनेच मुलाचा खून करण्यासाठी सुपारी देणारी ही घटना मन सुन्न करणारी आहे.

# कविवर्य ना.धों.महानोर यांना आचार्य अत्रे मानचिन्ह पुरस्कार

## जळगाव येथील गांधीतीर्थ येथे १३ ऑगस्टला पुरस्कार वितरण सोहळा




**जळगाव/प्रतिनिधी**

संयुक्त महाराष्ट्राचे झुंजार सेनापती, साहित्य सम्राट, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या १२४ व्या जयंतीदिनी (१३ ऑगस्ट) आचार्य अत्रे मानचिन्हाचा पुरस्कार यावर्षी प्रख्यात कवी ना. धो. महानोर यांना प्रदान केला जाणार आहे. विशेष म्हणजे हा समारंभ खानदेशच्या मातीत जळगाव येथे १३ ऑगस्ट २०२२ रोजी कस्तुरबा सभागृह, गांधी तीर्थ, जळगाव येथे सायंकाळी ५.३० वाजता संपन्न होणार आहे. आचार्य अत्रे यांचे निधन १३ जून १९६९ रोजी झाले. त्यानंतर १९७१ पासून २०२१ पर्यंत 'साहित्यसम्राट आचार्य अत्रे मानचिन्ह पुरस्कार' प्रदान करण्याचे कार्यक्रम मुंबईत आणि पुण्यात झाले. दिनांक १३ ऑगस्ट रोजी जळगावात होणारा हा पुरस्कार प्रदान समारंभ पहिल्याप्रथम खानदेशात होत आहे. आचार्य अत्रे यांचे खानदेशच्या मातीशी घनिष्ठ संबंध होते. प्रख्यात कवी बहिणाबाई चौधरी यांच्या काव्याचे महाराष्ट्रभर कौतुक करण्याचे काम पहिल्याप्रथम आचार्य अत्रे यांनी केले. दैनिक मराठातून बहिणाबाईंच्या कवितांवरचा गाजलेला अग्रलेख आजही महाराष्ट्रात चर्चेत असतो. श्री. सोपानदेव चौधरी आचार्य अत्रे यांचे खास मित्र होते. याखेरिज आचार्य अत्रे यांच्या द्वितीय कन्या श्रीमती मिनाताई देशपांडे यांचा विवाह धुळे येथील प्रा. सुधाकर देशपांडे यांच्याशी झाल्यामुळे अत्रे कुटुंबीयांचा खानदेशची जवळचा संबंध आहे. या वर्षीचा पुरस्कार कवीश्रेष्ठ ना. धों. महानोर यांना 'आत्रेय' तर्फे ॲड. राजेंद्र पै यांनी जाहीर केला. ते आचार्य अत्रे यांचे नातू आहेत. हा कार्यक्रम मुंबईत न करता जळगाव येथेच करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे. आमदार शिरीष मधुकरराव चौधरी हे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. खानदेशमध्ये होणाऱ्या आचार्य अत्रे जयंती समारंभाला उपस्थित राहावे, अशी विनंती ॲड. राजेंद्र पै यांनी केली आहे. या समारंभाला स्व. सुधाकर देशपांडे यांचे सुपुत्र अमेरिकेत असणारे ॲड. हर्षवर्धन देशपांडे हेसुद्धा उपस्थित राहून खानदेशच्या भूमिला अभिवादन करायला येणार आहेत.

# ओआरएस, झिंक हा जुलाब, उलटी यावर प्रभावी उपचार -डॉ.जमादार

**लातूर/प्रतिनिधी**

जुलाब, उलटीव्दारे शरीरातील पाणी व क्षार मोठ्या प्रमाणात बाहेर पडून अशक्तपणा वाढतो. अशा स्थितीत शरीरातील पाणी - क्षार यांची हानी भरून काढण्यासाठी मिठ, साखर, पाणी ही जलसंजीवनी अथवा ओआरएस आणि झिंक यांचे सेवन हा जुलाब, उलटीवर प्रभावी उपचार आहे. बाळास ओआरएस अथवा जलसंजीवनी पाजल्यास जुलाब, उलटी थांबते व मृत्यूपासून बचाव होतो, असे प्रतिपादन एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार यांनी केले. येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील बालरोग विभागाच्या वतीने जागतिक ओआरएस दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. एन. पी. जमादार बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. एच. मिश्रा, बालरोग विभाग प्रमुख डॉ. विद्या कांदे, बालरोग तज्ञ डॉ. महेश सोनार, डॉ. शिल्पा दडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ.




एन. पी. जमादार म्हणाले की, दूषीत पाणी, अस्वक्षता आणि खेळताना अजानतेपणाने बाळाच्या पोटात जीवाणू व विषाणू प्रवेश करतात. त्यामुळे बाळास जुलाब, उलटी होऊन शारीरातील पाणी व क्षार बाहेर पडत असतात. अशा परिस्थितीत आजाराकडे दुर्लक्ष न करता बाळास स्वच्छ पाण्यात तात्काळ ओआरएसचे पावडर मिसळून पाजावे व डॉक्टरांच्या सल्लयाने झिंकची गोळी द्यावी. ओआरएस उपलब्ध होत नसल्यास घरातील मिठ, साखर व पाणी यांचे मिश्रण करुन ते बाळास पाजावे. हे उपचार बाळाला रुग्णालयात नेईपर्यंत द्यावेत. जेणेकरुन बाळाच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण नियंत्रणात राहील. जुलाब, उलटी झाल्यास प्रौढ व्यक्तीही हा उपचार घेवू शकतात, असे डॉ. जमादार यांनी सांगीतले. डॉ. पी. एच. मिश्रा म्हणाले की, जुलाब अथवा अन्या कारणाने अचानक शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने बालक दगावू शकते. त्यामुळे बाळास आवश्यक त्या प्रमाणात पाणी पाजावे व स्वच्छता राखून अन्न शिजवून द्यावे. डॉ. विद्या कांदे म्हणाल्या की, लहान मुलांना जंतुसंक्रमनामुळे जुलाब हा आजार होतो. जगभरात पाच वर्षाखालील मुलांचे जुलाबामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण हे दुसऱ्या स्थानी आहे. मात्र लहान मुलांना जुलाब, उलटी झाल्यानंतर वेळेत जोडी नं. १ अर्थात ओआरएस व झिंक दिल्यास ९३ टक्के एवढ्या प्रमाणात बालमृत्यू टाळता येतात. डॉ. महेश सोनार म्हणाले की, बाळाने दात काढल्यामुळे जुलाब होतो हा समज चुकीचा असून व्हायरस पोटात गेल्याने जुलाब होऊन शरीरातील पाणी कमी होते. अशावेळी ओआरएस दिल्यास बाळास सलाईन लावण्याची गरज भासणार नाही. त्यासोबत झिंक दिल्यास पुढील अडीच तीन महिने जुलाबापासून संरक्षण होते. यावेळी डॉ. अखिलेश अंजान यांनी जागतिक ओआरएस दिनाविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निखील नंदवाणी यांनी केले तर आभार अभिषेक जैन यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. शिल्पा दडगे, डॉ. सोनल रे, डॉ. व्यंकटेश माहुरे, डॉ. अपर्णा आस्था, डॉ. स्नेहल सोनकांबळे, डॉ. दिपीका माशाळकर, परिचारीका शाकिरा हिप्परगे, कविता येरमाळे, लिपीक किरण साबळे, सेवक सुग्रीव केंद्रे यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा बसवेश्वरमध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक मेळाव्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखा, युवती मंच आणि महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा.माधवराव पाटील (टाकळीकर) यांची उपस्थिती लाभणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने आणि प्रचिती कॉम्प्युटरचे संचालक उदय देशपांडे, प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे व पर्यवेक्षक प्रा.एस.व्ही.पवार यांची उपस्थिती लाभणार आहे. या विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळाव्याला महाविद्यालयातील अकरावी विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे, पर्यवेक्षक प्रा.एस.व्ही. पवार, बोर्ड समन्वयक प्रा.व्ही.सी.पाटील, युवती मंच अध्यक्ष व तत्वज्ञान विभागप्रमुख डॉ.शीतल येरुळे, नेट/जेईई समन्वयक प्रा.एस.एस.पानगावे आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक यांनी केले.

# इको कार, रिक्षा, बोलेरो पिकअप आणि दुचाकी चोरीच्या २२ गुन्ह्यांचा पोलिसांनी लावला छडा, पाच आरोपी अटक




**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात मागील काही दिवसांपासून वाहन चोरींच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झालेली असताना शांतीनगर पोलिसांनी पाच जणांच्या मुसक्या आवळत तब्बल २२ वाहन चोरीच्या गुन्ह्यांची उकल केली आहे. भिवंडी पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी भिवंडी शहरातील वाहन चोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्या बाबत सर्वच पोलीस ठाण्यांना सक्त सूचना दिल्या असताना शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र म्हात्रे, पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव यांच्या सोबत पोलीस पथकातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भोलासो, पोलीस हवालदार रवींद्र जाधव, रिजवान सय्यद, तुषार वडे, संजय पाटील, किरण जाधव, प्रसाद काकड, महेश चौधरी, श्रीकांत पाटील, अमोल इंगळे, रवींद्र पाटील दीपक सानप या सर्व पोलीस पथकाने पोलीस ठाण्यातील हद्दीत विशेष गस्त आणि गुप्त बातमीदार यांच्या माध्यमातून माहिती काढून अजय कुमार दशरथ वर्मा, मोहम्मद सरजिल उर्फ हमजा सिराज अहमद मोमीन, वाहिद हुसेन शेख, जहुर मोहम्मद हसन शेख, सादिक जुबेर खान अशा आरोपींच्या मुसक्या आवळल्या असता त्यांच्या कडील चौकशीत शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीतील ११ वाहन चोरीच्या गुन्ह्यांसह भिवंडी शहर पोलीस ठाणे हद्दीतील ५, नारपोली, निजामपुरा, भोईवाडा, नौपाडा, मुंब्रा, कोपरी या पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एक अशा २२ गुन्ह्यातील १३ दुचाकी, बोलेरो पिकअप १, इको कार ३, अँटो रिक्षा ३, घरफोडी मधील सोन्या चांदीचे दागिने असा एकूण १२ लाख १९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंची जयंती साजरी



**लातूर** : महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि महाविद्यालय जयंती उत्सव समितीद्वारा आज लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.संजय गवई, डॉ.यशवंत वळवी, डॉ.जितेंद्र देशमुख, डॉ.श्रीराम भालेराव, प्रा.रमेश तडवी, प्रा.शंकर भोसले, प्रा.संगमेश्वर धाराशिवे, अनिल उस्तुरगे, विनायक लोमटे, शुभम बिरादार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.


## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'ई' नालासोपारा पश्चिम, मुख्य कर्यालय-विरार**
**दुरध्वनी : १२२५०-२४०२१७९/२४०२५६३**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | निळेमोरे-३ | NL26/9/145 | ९२६ | तेजपाल बी. शेट्टी | संजयकुमार सोलंकी |
| २. | निळेमोरे-४ | NL27/8/18 | ९३५ | दिलीप सिद्धेश्वर शिंदे | जितेंद्रकुमार पटेल व प्रेमलता जितेंद्रकुमार पटेल |
| ३. | निळेमोरे-३ | NL26/3/26 | ९५२ | अब्दुल खालीक शेख | रिचा कृष्णकांत काडगे व कृष्णकांत गणेश काडगे |
| ४. | निळेमोरे-१ | NL24/38/6 | ८९३ | भरत एच. गोहिल | प्रसाद नरेश नाईक व मृणाली प्रसाद नाईक |
| ५. | निळेमोरे-४ | NL27/26/13 | ८९४ | विवेकानंद दत्तात्रेय अभ्यंकर | विराज राजू कोलाटकर व राजू रामचंद्र कोलाटकर |
| ६. | निळेमोरे-१ | NL24/62/29 | ९७५ | मणीबेन मेघजी छेडा | श्रीनाथ विश्वम्भर वर्मा व रमावती विश्वम्भर वर्मा |
| ७. | निळेमोरे-४ | NL27/99/27 | १०३१ | डेनिस एस. परेरा | रतन शामजी डोडीया |
| ८. | निळेमोरे-३ | NL26/9/153 | १०५५ | मेहन्द्र परशुराम तोरस्कर | क्रिस्टल संजय घोन्साल्वीस |
| ९. | निळेमोरे-४ | NL27/64/3 | १०६५ | सदानंद पांडुरंग चाळके | आरती रामचंद्र देवळेकर व रामचंद्र अनंत देवळेकर |
| १०. | निळेमोरे-१ | NL24/58/19 | १०६६ | दिप्ती महाडीक | आरती विशाल साव व विशाल अरविंद साव |
| ११. | निळेमोरे-२ | NL25/100/15 | १०६४ | संदिप कृष्णा इंदप | नागेश देवीदास पुल्ली व विणा नागेश पुल्ली |
| १२. | निळेमोरे-१ | NL24/50/32 | १०६३ | आर. के. सावंत | प्रकाश बावतीस मोत व सुनिता प्रकाश मोत |
| १३. | निळेमोरे-१ | NL24/99/6 | १०५२ | कृष्णकुमार प्रजापती व निर्मला प्रजापती | ताहिर अलीअसगर पाटनवाला व अलीअसगर अब्दुल्ला पाटनवाला |
| १४. | निळेमोरे-४ | NL27/52/19 | १०७९ | विजया विजय आंबेकर | विजय लक्ष्मण आंबेकर |
| १५. | निळेमोरे-१ | NL24/9/154 | १०९१ | सदानंद तेलंग | अमित सदानंद तेलंग |
| १६. | निळेमोरे-३ | NL26/76/5 | ११४२ | रुपेशकुमार प्रभाकर चव्हाण | अशोक रामचंद्र पाटेकर व शुभांगी अशोक पाटेकर |
| १७. | निळेमोरे-२ | NL25/96/15 | ११४१ | बालाजी इंटरप्राईजेस | शामकांत झा आशिदेवी झा |
| १८. | निळेमोरे-४ | NL27/30/16 | ११६१ | वरदराज कंदन दैवेंद्रन | भगवान दगडू तांबे |
| १९. | निळेमोरे-६ | NL29/204/87 | १३६६ | सुमतीनाथ बिल्डर्स | अमित रामजी दुबे व कल्पना अमित दुबे |
| २०. | निळेमोरे-६ | NL29/204/348 | १३६३ | सुमतीनाथ बिल्डर्स | रामजी टी.दुबे व उर्मिला आर दुबे |

जावक क्र.: वविशम/कवि/७५०/२०२२-२३
दिनांक : ०१/०८/२०२२

सही/-
धनश्री शिंदे
सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई-विरार शहर महानगरपालिका



## जिल्हा परिषद पालघर

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/९०/२०२२ — दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे कोकणेर-२ गावे तालुका पालघर येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारणात्मक पूर्नजोडणी करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर



## जिल्हा परिषद पालघर

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२१८/२०२२ — दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे लोहपे तालुका वाडा येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर



## जिल्हा परिषद पालघर

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२२०/२०२२ — दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे निचोळे तालुका वाडा येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.


सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर

08 TO 14 AUGUST 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 8/6/2022 10:01 PM Page 1



# घटनापीठा समोरील धर्म संकट!

पक्षांतर हा खरे तर जनतेच्या नजरेत एक गुन्हा आहे. कारण जेंव्हा एखाद्या उमेदवाराला मतदार मतदान करतो तेंव्हा त्याच्यावर त्याने पाच वर्षांसाठी विश्वास टाकलेला असतो. अशावेळी जर त्याने त्याच्या फायद्यासाठी पक्षांतर केले तर तो मतदाराचा विश्वासघात आहे आणि अशा विश्वासघाताची एकच शिक्षा असायला हवी आणि ती म्हणजे त्याचे सदस्यत्व पद रद्द व्हायला हवे. सध्या महाराष्ट्रातील बंडखोरांच्या अपात्रतेचा मुद्दा सर्वोच्च न्यायालय समोर आहे. पण मुख्य न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखालील खंड पिठाला सुद्धा त्यावर निर्णय घेता आलेला नाही. त्यामुळे आता हे प्रकरण घटना पिठा कडे वर्ग केले जाणार आहे. पण घटना पीठाने या प्रश्नावर निर्णय देताना मतदारांच्या भूमिकेचा सुद्धा विचार करायला हवा. तसे केले नाही तर तो अन्याय ठरेल. त्यामुळे हे प्रकरण म्हणजे एक न्यायपालिका समोर एक धर्मसंकट आहे आणि त्यावर जो काही निर्णय येईल तो देशाच्या राजकारणासाठी ऐतिहासिक असेल. महाराष्ट्रातील राजकीय पेच हा आता न्यायालयासमोर अवघड प्रश्नचिन्ह बनलेले आहे. कारण या प्रश्नावर विधानसभा, लोकप्रतिनिधी आणि राज्यपाल तसेच सभापती यांचे अधिकार अधोरेखित केले जाणार आहेत. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात ज्या पाच याचिका दाखल झाल्यात त्याच्यावरील सुनावणी संपूर्ण देशातील विधी मडले आणि लोकप्रतिनिधींसाठी मार्गदर्शक ठरू शकणार आहेत. गेल्या दोन दिवसात सर्वोच्च न्यायालयात जी सुनावणी सुरू आहे त्या सुनावणीत कपिल सिब्बल आणि हरीश साळवे या दोन ज्येष्ठ वकिलांनी कायद्याचा अक्षरशः किस काडला. त्या दोघांनी त्यांच्या सुनावणीत उपस्थित केलेले प्रश्न हे घटनेच्या अभ्यासकांसाठी खरोखरच मार्गदर्शक ठरू शकतात. शिवसेना पक्ष सोडणाऱ्या १६ आमदारांचे निलंबन योग्य की अयोग्य तसेच त्यांनी काडलेला व्हीप योग्य की शिवसेना पक्षचे प्रतोद यांनी काढलेला योग्य त्याच बरोबर राज्यपालांनी विश्वासदर्शक ठरावावर मतदान घेण्यासाठी बोलावले. विधानसभेचे अधिवेशन हा त्यांचा निर्णय योग्य की अयोग्य आदी प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयात गेले दोन दिवस चर्चा झाली आणि यावर आता सोमवारी न्यायालय निकाल देणार आहे. या निकालात जर शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र ठरले तर सरकारच कोसळेल आणि जर ते पात्र ठरले, तर मात्र भविष्यात कुठलीही सरकारे कधीही कोसळू शकतात. कारण घटनेच्या अनुच्छेद १० नुसार एखादा गट पक्षातून बाहेर पडून २/३ बहुमताच्या आधारे जर आपले बहुमत सिद्ध करू शकत असेल किंवा आपल्याला वेगळा गट म्हणून मान्यता मिळवून घेऊ शकत असेल तर देशाच्या कुठल्याही राज्यात अशा प्रकारे पक्षांतर्गत गटबाजी होऊन सरकारे कोसळू शकतात. बुधवारच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हीच भीती व्यक्त केलेली आहे. मुळात पक्षांतर बंदी कायदाच बकवास आहे. कारण या कायद्यात मतदाराच्या हिताचा कोणताही विचार केलेला नाही. मतदार हा निवडणुकीतील मुख्य घटक असतो. त्यामुळे पक्षांतर बंदी कायद्यात त्याच्या भूमिकेचा विचार व्हायला हवा. पण गेल्या दोन दिवसांच्या सुनावणीत जेंव्हा बंडखोरांचे पक्षांतर वैद्य की अवैद्य यावर जेंव्हा सुनावणी झाली तेंव्हा त्यात मतदारांच्या भूमिकेबद्दल किंवा अधिकरांबद्दल दोन्ही पक्षाच्या वकिलांनी किंवा न्यायालयानेही विचार केला नाही हे चुकीचे आहे. आणि असे असेल तर भविष्यात होणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत मतदारांनी का भाग घ्यावा? आणि म्हणूनच सोमवारी १६ आमदारांच्या पात्र अपात्र ते बद्दल जो काही निकाल लागेल तो अपूर्ण असेल. कारण त्यात निवडणुकीचा प्रमुख घटक असलेल्या मतदाराच्या भूमिकेचा विचार केलेला नसेल. जर समजा कायद्यात तशी तरतूद नसेल तर संसदेत ज्यांचे बहुमताचे सरकार असेल त्यांनी तशी कायद्यात तरतूद करून घ्यायला हवी. पण तसे होणार नाही. कारण तसे केले तर आयाराम गयाराम यांच्यासाठी ते अडचणीचे ठरेल. पण लोकशाहीत लोकांचे अधिकार शाबूत राहण्यासाठी पक्षांतरविरोशी कायद्यात लोकांच्या भूमिकेचा विचार व्हायलाच हवा!



# अमेरिकेच्या कारवाईत ठार झालेला अल जवाहिरी कोण?

**दिशायन**

कुख्यात आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना अल-कायदाचा म्होरक्या अयमान अल-जवाहिरी अफगाणिस्तानची राजधानी काबूलमध्ये अमेरिकेच्या हवाई (ड्रोन) हल्ल्यात ३१ जुलै रोजी ठार झाला. अल-जवाहिरी आणि ओसामा बिन लादेन यांनी अमेरिकेवरील ९-११' च्या विनाशकारी दहशतवादी हल्ल्याची योजना आखली होती. 'अमेरिकेवरील ९-११'च्या अमानुष हल्ल्याच्या नियोजनात अल-जवाहिरीची भूमिका होती. अमेरिकेच्या भूमीवर आतापर्यंत झालेल्या सर्वात घातक हल्ल्यात दोन हजार ९७७ अमेरिकी नागरिक मारले गेले होते. आमच्या नागरिकांना धोका निर्माण करणाऱ्यांपासून संरक्षणासाठी अमेरिका कायमच वचनबद्ध राहील. कितीही वेळ लागला आणि कुठेही लपला असला तरी देशासाठी धोका ठरणाऱ्या व्यक्तीस अमेरिका शोधून काढेलच, हल्ल्यानंतर अशी प्रतिक्रिया अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी दिली. अल जवाहिरीने अल-कायदाचे अस्तित्व कायम राहील आणि त्याची पाळेमुळे जगभरात पसरतील यासाठी प्रयत्न केले होते. महत्वाचे म्हणजे अमेरिकेने अफगाणिस्तामधून सैन्य माघारी बोलावल्यानंतर ११ महिन्यातच ही कारवाई करत मोठे यश मिळवले आहे. काबूलमधील एका घरात जवाहिरी आपल्या कुटुंबासह लपून बसला होता. जवाहिरी घराच्या सज्जात (बाल्कनी) असताना ड्रोन'मधून दोन क्षेपणास्त्रे त्याच्यावर डागली गेली त्यात जवाहिरी मारला गेला.

### अल जवाहिरी कोण होता?

९/११ हल्ल्याचे साक्षीदार असणारे किंवा झळ बसलेल्या अमेरिकी नागरिकांना हे नाव माहिती नसावे, मात्र त्याचा चेहरा गेल्या दोन दशकांपासून ते पाहत आहेत. अमेरिकेवर झालेल्या हल्ल्यानंतर वारंवार दाखवण्यात आलेल्या फोटोत चष्मा घातलेला आणि चेहऱ्यावर हास्य असणारा अल जवाहिरी ओसामा बिन लादेनच्या शेजारी बसलेला दिसतो. मुळचा इजिप्तचा असणाऱ्या अल जवाहिरीचा जन्म १९ जून १९५१ मध्ये कैरो उपनगरातील एका कुटुंबात झाला होता. अल जवाहिरी लहानपणासूनच फार धार्मिक होता. इस्लामिक शासनाचा संदर्भ देत इजिप्त आणि इतर अरब राष्ट्रांमधील सरकारे बदलण्याचा प्रयत्न करणाऱ्या सुन्नी इस्लामिक पुनरुज्जीवनाच्या शाखेत अल जवाहिरी सहभागी झाला होता. अल जवाहिरीने तरुणपणी नेत्रचिकित्सक म्हणून काम केले होते. त्याने मध्य आशिया आणि मध्य पूर्व भागांचा दौरा केला होता, जिथे त्याने अफगाणिस्तानचे सोव्हिएतविरोधातील युद्ध पाहिले. सोव्हिएत सैन्याला हुसकावून लावण्यासाठी अफगाणिस्तानला मदत करण्याच्या हेतूने त्याने ओसामा बिन लादेन आणि इतर अरब दहशतवाद्यांची भेट घेतली होती.

१९८१ मध्ये इस्लामिक कट्टरतावाद्यांनी अध्यक्ष अन्वर सादात यांची हत्या केल्यानंतर इजिप्तमध्ये अटक करुन तुरुंगात छळ झालेल्या शेकडो अतिरेक्यांमध्ये अल जवाहिरीचाही समावेश होता. तुरुंगामधील या अनुभवाने त्याला अजून कट्टरता दिली असे चरित्रकार सांगतात. सात वर्षांनी जेव्हा, लादेनने अल-कायदाची स्थापन केली तेव्हा अल जवाहिरी तिथे उपस्थित होता. अल जवाहिरीने आपला इजिप्तमधील दहशतवादी गट अल-कायदामध्ये विलीन केला होता. इजिप्तमध्ये अंडरग्राऊंड राहून आणि गुप्तचर यंत्रणांना चकवा देत अल जवाहिरीने अल-कायदाला संघटनात्मक कौशल्य आणि अनुभव दिले. यामुळे अल कायदाला त्यांचे वेगवेगळे गट निर्माण करून जगभरात हल्ले करता आले.

### अल जवाहिर सर्वोच्च नेता

अल जवाहिरीने ९/११ हल्ल्यासाठी आत्मघाती हल्लेखोरांना एकत्र आणले होते. योजना आखण्याचे आणि निधी जमावण्याचे कामही त्याच्याकडे होते. ९/११ नंतर आणखी एक हल्ला करण्यासाठी त्याने संघटनेला कोणतेही नुकसान होणार नाही याची खात्री केली होती. ९/११ हल्ल्यानंतर फरार झालेल्या अल जवाहिरीने अफगाणिस्तान-पाकिस्तान सीमेवर अल कायदाचे नेतृत्व नव्याने उभे केले होते. इराक, आशिया, येमेन आणि इतर ठिकाणी अल जवाहिरी सर्वोच्च नेता होता. ९/११ नंतरही अल-कायदाने जवळच्या आणि दूरच्या शत्रूंना लक्ष्य करत बाली, मोम्बासा, रियाध, जकारता, इस्तंबूल, लंडन यासह इतर ठिकाणी अनेक हल्ले केले. २००५ मध्ये लंडनमध्ये झालेल्या हल्ल्यात ५२ लोक मारले गेले होते. अल-कायदाने केलेला हा पश्चिमेकडील शेवटचा हल्ला होता. कारण अमेरिकेसह इतरांनी केलेले ड्रोन हल्ले, दहशतवादविरोधी छापेमारी आणि क्षेपणास्त्रे यामुळे अल-कायदाशी संबंधित अनेक दहशतवादी मारले गेले होते आणि त्यांचे नेटवर्कही उद्ध्वस्त झाले होते.

### अल जावहिरीला कसे मारले?

रविवारी पहाटेच्या वेळी अल जवाहिरी अफगाणिस्तानची राजधानी काबुलमधील घराच्या बाल्कनीत आला होता. अल जवाहिरी रोज बाल्कनीत येत असल्याचे आणि काही वेळ तिथेच थांबत असल्याचे अमेरिकी गुप्तचर यंत्रणांच्या लक्षात आले होते. अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर माध्यम संस्थांना दिलेल्या माहितीनुसार, अल जवाहिरी बाल्कनीत उभा असताना ड्रोनच्या सहाय्याने दोन हेलफायर मिसाइल्सने हल्ला करण्यात आला. अल जवाहिरी गेल्या काही काळापासून अफगाणिस्तामध्ये असल्याचा संशय होता. अल जवाहिरीची पत्नी आणि इतर कुटुंबीय काबूलमधील सुरक्षित घरात राहण्यासाठी गेल्याची माहिती अमेरिकेच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. यानंतर अल जवाहिरीही तिथे गेला होता. बायडन यांनी २५ जुलैला या हल्ल्यासाठी संमती दिली होती. घरामध्ये जवाहिरीचे कुटुंबदेखील होते. मात्र त्यांना कोणतीही इजा झाली नसल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. जवाहिरीला ठार केल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी, अनेक दशकांपासून त्याने अमेरिकी नागरिकांवर अनेक हल्ल्यांचे कट रचले होते. त्याच्या मृत्यूने आता त्यांना न्याय मिळाला आहे. जगाला आता भविष्यात या नरसंहारक दहशतवाद्याची भीती बाळगण्याची गरज नाही. या हल्ल्याच्या यशामागे अमेरिकेच्या गुप्तचर विभागाची असाधारण चिकाटी आणि कौशल्य आहे. कितीही उशीर लागला, तुम्ही कुठेही लपलात तरी, आमच्या लोकांसाठी धोका असाल तर अमेरिका तुम्हाला शोधून बाहेर काढणार, असा इशारा यानिमित्ताने बायडन यांनी दिला आहे.

# 'मरावे परी कीर्ती रूपे उरावे'

## लातूरच्या सिंधुताई सिद्राम तळवार यांनी अवयवदान करून दिले तिघांना नवजीवन!

लातूर शहरात राहणाऱ्या सिंधुताई सिद्राम तळवार (वय ६४ वर्ष) यांना २३ जुलै रोजी अर्धांगवायूचा अटॅक आला आणि त्या घरीच चक्कर येऊन पडल्या. या अपघातात त्यांच्या मेंदूला गंभीर ईजा झाली. त्यांना तात्काळ लातूरच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र डॉक्टरांनी त्यांचं ब्रेन डेड झाल्याचं निदान केलं. त्यांची मुले, जावई विजय कोळी(जि.प.शिक्षक) त्यांचे सहकारी विजय माळाळे, रामेश्वर गिल्डा यांनी सिंधुताई यांचे अवयवदान करण्याचा मानस व्यक्त केला आणि समुपदेशन करून कुटुंबियांना या सर्वोच्च दानासाठी प्रेरित केले. विजय माळाळे हे माझं लातूर या सामाजिक परिवाराचे क्रियाशील सदस्य आहेत त्यांनी रविवारी दिनांक २४ रोजी मला ही संपूर्ण माहिती दिली आणि ही प्रक्रिया पूर्ण व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. क्षणाचाही विलंब न करता या संवेदनशील विषयाची माहिती लातूरचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी पी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ सुधीर देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ लक्ष्मण देशमुख, डॉ संतोष डोपे, डॉ उदय मोहिते यांना दिली गेली आणि आश्चर्य...अवघ्या दोन तासात जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी पी यांच्या मार्गदर्शनाखाली या अवयवदान संकल्पाला



पूर्णत्वास नेण्याची प्रक्रिया सुरू झाली. काही कारणास्तव ही प्रक्रिया लातूरमध्ये करणे शक्य नव्हते तेंव्हा जिल्हा प्रशासनाने सोलापूर जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून ही प्रक्रिया यशस्वी होईल याची पूर्ण खात्री केली. त्याच दिवशी रुग्णवाहिका, तज्ञ डॉक्टर आणि सोबत अत्यावश्यक वैद्यकीय साहित्यासह सिंधुताई यांना त्यांच्या कुटुंबियांसह सोलापूरला नेण्यात आले. तेथील सर्व कायदेशीर सोपस्कार पार पाडून सोलापूरमध्ये अवयवदानाची प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. यात २ किडनी, १ लिव्हर, २ डोळे अशा तीन अवयवांचे गरजू रुग्णांना प्रत्यारोपण करण्यासाठीची यशस्वी क्रिया पार पडली. हे अवयव पुणे येथे नेण्यासाठी सोलापूरमध्ये ग्रीन कॉरिडॉर करण्यात आला यासाठी सोलापूर आरोग्य प्रशासन आणि पोलिस प्रशासनाने उल्लेखनीय कामगिरी केली. सिंधुताई तळवार यांच्या मुलांनी घेतलेल्या या निर्णयाने आणि या सर्वोच्च दानासाठी प्रेरीत करणारे त्यांचे जावई जि प शिक्षक विजय कोळी, विजय माळाळे, रामेश्वर गिल्डा यांच्या प्रयत्नांना यश आले असून या अवयवदानामुळे ४ गरजू रूग्णांना नवजीवन मिळाले आहे. सिंधुताई यांचे पार्थिव २७ जुलै रोजी लातूरला आणण्यात आले आणि त्याच दिवशी दुपारी १२ च्या दरम्यान खाडगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सिंधुताई यांना २ मुले, ३ मुली आणि नातवंडे असा परिवार असून २ मुलींचे लग्न झाले आहे तर एक मुलगी अंध आहे जी पूर्णतः तिच्या आईवर म्हणजेच स्व.सिंधुताई यांच्यावर अवलंबून होती. तळवार कुटुंबाने घेतलेला अवयावदानाचा क्रांतिकारी निर्णय समाजाला एक नवी प्रेरणा आणि दिशा देणारा ठरणार आहे. अवयावदानाची ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासन आणि सोलापूर जिल्हा प्रशासनाने दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे. अवयवदान या चळवळीला गती देणाऱ्या तळवार कुटुंबियांची शासनस्तरावर दखल घेतली जावी हीच अपेक्षा....!

– सतीश तांदळे, लातूर

### ९ ऑगस्ट या जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्त

## आदिवासी समाजाच्या न्याय हक्कासाठी प्रहार जनशक्ती पक्षातर्फे डहाणू तहसीलदार कार्यालयावर भव्य संघर्ष मोर्चाचे आयोजन

**विरार/प्रतिनिधी**

आदिवासी समाजाच्या वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मागण्या, त्यांच्या मूलभूत गरजा, त्यांना भेडसावत असलेल्या समस्या/अडीअडचणी याकडे राज्य शासनाने लक्ष्य वेधण्यासाठी मंगळवार दिनांक ०९ ऑगस्ट या जागतिक आदिवासी दिनाचे आणि ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने डहाणू तहसीलदार कार्यालयावर भव्य संघर्ष मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार ओमप्रकाश उर्फ बचुभाऊ कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पालघर जिल्हाध्यक्ष हितेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली या भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

हायस्पीड बुलेट ट्रेन प्रकल्पग्रस्त आदिवासींना योग्य मोबदला मिळणे, पिढ्यान पिढ्या कसत असलेली वनजमीन, गायरान जमीन, पडीक जमीन, सरकारी जमीन आदिवासींच्या नावे करणे. आदिवासी शेतकऱ्यांना जमिनीचे पट्टे नावावर करून देणे, आदिवासी पाड्यांवर पिण्याचे पाणी, स्मशानभूमी, आदिवासी तरुणांसाठी व्यायामशाळा, रस्त्यांवर दिवाबत्ती, आदिवासी शेतकऱ्यांना शेतीविषयक खते बी-बियाणे, अवजारे, इत्यादी साधन सामग्री मिळणे, विविध शासकीय दाखले वेळेत उपलब्ध करून देणे, आदिवासी बांधवांच्या आरोग्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करणे, जिल्हापरिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्या दुरुस्त करणे, आदिवासी बांधवांना घरकुल योजनेचा लाभ मिळून देणे, रोजगार हमी योजनेतून पूर्णवेळ रोजगार आणि योग्य मोबदला देणे, भूमिहीन आदिवासींना जमीन उपलब्ध करून देणे या व अशा अनेक मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने या आंदोलनाचे प्रयोजन केले आहे. पालघर जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांनी मनाई आदेश जाहीर केल्यामुळे आणि ०९ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे प्रहार जनशक्ती पक्षाने त्या दिवशी आंदोलन न करता त्याऐवजी दिनांक ०५ ऑगस्ट २०२२ रोजी चर्चेकरिता भेटीस यावे अशी सूचना तहसीलदार, डहाणू यांच्याकडून करण्यात आली होती. मात्र जागतिक आदिवासी दिनाचे महत्व लक्षात घेता हे आंदोलन ०९ ऑगस्ट या जागतिक आदिवासी दिनाच्या दिवशीच करण्याबाबत प्रहार जनशक्ती पक्षाने आपली भूमिका ठाम ठेवली. आदिवासींच्या जीवनात या दिवसाला अनन्यसाधारण महत्व आहे.

राज्य शासन हे देखील आपल्या भावना समजून घेत आपल्याला न्याय मिळवून देण्यासाठी तत्पर आहे अशी भावना प्रत्येक आदिवासींच्या मनात निर्माण व्हावी त्याचप्रमाणे आदिवासी बांधवाना भेडसावणाऱ्या समस्या अडीअडचणी, मूलभूत गरजा भागविण्यासाठी त्यांना करावी लागत असलेली कसरत याबाबत प्रशासनातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सुद्धा माहिती व्हावी या उदात्त हेतूने प्रहार जनशक्ती पक्षाने या आंदोलनाचे आयोजन केले असल्याचे मत प्रहार जनशक्ती पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष हितेश जाधव यांनी व्यक्त केले आहे. यावेळी डहाणू तालुक्यातील हजारो आदिवासी बांधव आपल्या पारंपारिक वेशभूषा, संस्कृती यांची ओळख, जतन व संवर्धन करण्यासाठी अशा पारंपारिक पद्धतीने या आंदोलनात सहभागी होणार आहेत. प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष हितेश जाधव, वसई शहर अध्यक्ष दुशांत पाटील आणि शेकडो महिला व पुरुष कार्यकर्ते या भव्य संघर्ष मोर्चात सहभागी होणार आहेत. डहाणू तालुक्यातील आदिवासी समाजातील लता नैनेश मोर, जिव्या मोर, लहानू हजारे, निलेश मोर, जयेश मोर, जगदीश मोर, बया शशिकांत हजारे, सुवर्णा नरेश शिरोंदे इत्यादींनी या आंदोलनास आपला पाठिंबा दर्शविला आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

08 TO 14 AUGUST 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 8/6/2022 10:11 PM Page 1



# पाटण तालुक्यातील भूस्खलन झालेल्या गावांच्या पुनर्वसनासाठी ४ कोटींचा निधी – मुख्यमंत्री शिंदे



**मुंबई/प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आंबेघर खालचे,अंबेघर वरचे, ढोकावळे, मिरगाव, हुंबरळी, शिद्रुकवाडी, जितकरवाडी (जिंती) या सात गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्यासाठी ४ कोटी रूपयांच्या निधीची तरतूद करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मंत्रालयातील मुख्यमंत्री समिती कक्षात पाटण विधानसभा मतदार संघातील अतिवृष्टीमुळे भूस्खलन झालेल्या बाधित गावांच्या पुनर्वसनाबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.यावेळी या बैठकीला आमदार शंभूराज देसाई, अपर मुख्य सचिव (महसूल) नितीन करीर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधानसचिव असिम कुमार गुप्ता, वित्त विभागाच्या सचिव श्रीमती ए. शैला, साताराचे जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, पाटणचे उपविभागीय अधिकारी सुनिल गाडे यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील अतिवृष्टीमुळे भूस्खलन झालेल्या आंबेघर खालचे अंबेघर वरचे, ढोकावळे, मिरगाव, हुबळी, शिदुकवाडी, जितकरवाडी (निती) या ७ गावांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने खाजगी जमिन खरेदी करण्याकरीता तातडीने कार्यवाही करण्यात यावी या गावामध्ये ५५० घरे नव्याने उभारण्याच्या कामाला गती देण्यात यावी जेणेकरून या गावांचा कायमस्वरूपी पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्व समन्वयन यंत्रणांनी गतीने काम करावे असे निर्देश मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी बैठकीत दिले.

# देवणी तालुक्यात कृषी विभाग शेतकऱ्याच्या बांधावर

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील तळेगाव(भो) येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी विध्यापीठ यांच्या संयुक्त विध्यमाने कृषी विभागाकडून दिनांक ४ ऑगस्ट २०२२ रोजी शेतकऱ्यांच्या बांधावरच प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते सदरच्या कार्यक्रमांतर्गत जिल्हा कृषी अधिकारी डी एस गावसाने, कृषी शास्त्रज्ञ अरुण गोटे देशमुख, पंचायत समिती माजी उपसभापती शंकरराव पाटील, उपविभागीय कृषी अधिकारी उदगीरचे आर टी जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी लातूर महेश क्षिरसागर, तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे, आकाश पवार, काळे, गायकवाड, लोक कृषी अधिकारी अतुल माने, कृषी अधिकारी शिवप्रसाद वलांडे, एच एम पाटील,मोहन पांचाळ,लातूर जिल्ह्यातील



सर्व तालुका कृषी अधिकारी, कृषी अधिकारी, लातूर जिल्ह्यातील सर्व कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक बी एम जाधव, सहाय्यक जी.पी सूर्यवंशी,पोलीस पाटील संभाजी पाटील, गावचे सरपंच सदाशिव पाटील, उपसरपंच पती धनाजी जाधव, अण्णाराव पाटील, शंकर भाऊराव पाटील सर्व प्रगतशील शेतकरी यांच्या समक्ष सोयाबीन बीबीएफ लागवड केलेल क्षेत्र, पोखरा योजने अंतर्गत बांबू लागवड, पोखरा योजनेतून आंबा लागवड, पोखरा योजनेतील शेततळे, प्लास्टिक अस्तरीकरण व पोखरा योजने अंतर्गत कंपार्टमेंट बंडिंग कामाची पाहणी करण्यात आली. यावेळी कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ अरुण गोटे यांनी बीबीएफ लागवडीवरील सोयाबीन चे महत्व, सोयाबीन पिकावरील कीड रोग नियंत्रण, याविषयी सखोल अशी माहिती दिली.तर उपविभागीय कृषी अधिकारी आर टी जाधव यांनी पोखरा योजने अंतर्गत असलेल्या सर्व योजनांचा शेतक-यानी लाभ घ्यावा व जास्तीत जास्त लोकांनी रजिस्ट्रेशन १०० टक्के पूर्ण करून घ्यावे असे आवाहन केले.यावेळी संभाजी पाटील यांच्या प्रक्षेत्रावर शेततळे अस्तरीकरन याची पहाणी करून पोखरा अंतर्गत बांबू लागवडीचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे मंडळ कृषी अधिकारी अतुल माने यांनी आवाहन केले. यावेळी सोयाबीन टोकन पद्धतीने लागवड केलेल्या प्रक्षेत्राचीही पाहणी करण्यात आली.यावेळी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्टेट बँकेचे एटीएम मशीन दगडाने फोडून चोरीचा केला प्रयत्न; दोघांना केले जेरबंद!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

मोहोळ ते कुरुल रस्त्यावरील मुख्य चौकातील भारतीय स्टेट बँकेचे एटीएम मशीन दगडाने फोडून चोरी करण्याचा अयशस्वी प्रयत्न शनिवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास दोन चोरट्यांनी केला. सेंसरमुळे एटीएम शाखेच्या नियंत्रण कक्षाला चोरीच्या घटनेची माहिती मिळाली. त्यांनी तात्काळ मोहोळ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांच्या रात्रग्रस्त पथकाने एटीएम कडे धाव घेतली मात्र चोरटे पळून गेले शहरात मध्यवर्ती ठिकाणी कुरुल रस्त्यावर भारतीय स्टेट बँक आहे त्या जवळच एटीएम सेंटर आहे शनिवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास तोंडाला बांधलेले दोन चोरटे एटीएम सेंटरमध्ये घुसले त्यातील एकाने सीसीटीव्ही कॅमेऱ्याची दिशा बदलली तर दुसऱ्या चोरट्याने बाहेर जाऊन मोठा दगड आणून तो दगड एटीएम मशीनवर घालण्यास सुरुवात केली त्याच दरम्यान सेंटर मधील सेन्सरद्वारे एटीएम विभागाच्या महाराष्ट्र नियंत्रण कक्षाला माहिती मिळाली. तोपर्यंत चोरट्याने एटीएम च्या मशीन वर दगड घालून फोडण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला होता नियंत्रण कक्षाने मोहोळ पोलिसांच्या रात्रगस्त पथकातील पोलीस हवालदार शरद ढावरे यांच्या मोबाईलवर फोन करून घटनेची माहिती दिली. शरद ढावरे यांच्यासोबत असलेले पोलीस कर्मचारी लखन घाडगे, सिद्धेश्वर थोरात यांनी त्या एटीएम सेंटर कडे धाव घेतली. भरधाव वेगात येणाऱ्या पोलिसांची चाहूल लागतात दोन चोरटे अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले मध्यवर्ती ठिकाणी असलेले एटीएम मशीन फोडून लाखो रुपयांची लूट करण्याचा प्रयत्न पोलिसांच्या सतर्कतेमुळे अयशस्वी झाला आहे पैसे भरण्याच्या एटीएम मशीनची व कॅमेराची तोडफोड केल्याप्रकरणी बँकेचे उपव्यवस्थापक सुनील गाडे यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती व पोलीस निरीक्षक अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार शरद ढावरे व पोलीस कॉन्स्टेबल पांडुरंग जगताप, हरीश थोरात यांनी तपासाची चक्रे फिरवली, चोरटे हे सौन्दणें गावात असल्याची माहिती मिळाली त्यानंतर त्यांना त्यांच्या घरातून ताब्यात घेऊन चौकशी केली असता अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली मग विश्वासात घेऊन चौकशी केल्यावर चोरी करण्यासाठी गेले असल्याचे सांगितले. आरोपी पांडुरंग शिवाजी डुणे, गणेश सुरेश अनभूले दोघे रा सौन्दणें ता मोहोळ जि सोलापूर यांना पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास ताब्यात घेतले. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक सायकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार शरद ढावरे, पोलीस कॉन्स्टेबल पांडुरंग जगताप, हरीश थोरात यांनी केले आहे.

## महात्मा बसवेश्वरमध्ये समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसेटवार यांचे व्याख्यान!



**लातूर** : येथील महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील कला आणि वाणिज्य शाखा द्वारा रविवार ७ ऑगस्ट रोजी स.१०.३० वा. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये समाज कल्याण विभाग लातूरचे प्रादेशिक उपायुक्त मा.अविनाश देवसेटवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा. माधवराव पाटील (टाकळीकर) यांची उपस्थिती लाभणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे, पर्यवेक्षक प्रा.एस.व्ही.पवार, कला व वाणिज्य शाखा मुख्य समन्वयक प्रा.एस.आर.हावळे, वाणिज्य शाखा समन्वयक प्रा.एस.एस. कानडे व प्रा.डी.जे. बजाज आणि कला शाखा समन्वयक प्रा.आर.एम. सोनोने व प्रा.व्हि.जी. स्वामी यांची उपस्थिती लाभणार आहे. या विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळाव्याला महाविद्यालयातील अकरावी कला आणि वाणिज्य शाखेतील प्रवेशित विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे, कला व वाणिज्य शाखा मुख्य समन्वयक प्रा.एस.आर.हावळे, संयोजन समिती सदस्य व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी केले.


**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२२०/२०२२ दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत मौजे म्हसरोळी तालुका विक्रमगड येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर



**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/९७/२०२२ दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे भाताणे तालुका वसई येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारणात्मक पूर्नजोडणी करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर



**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२१३/२०२२ दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत मौजे अब्जे तालुका वाडा येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर



**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२१५/२०२२ दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे आपटी तालुका वाडा येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारणात्मक पूर्नजोडणी करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर



**वसई विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व, मुख्य कार्यालय-विरार**
**(दुरध्वनी क्रमांक ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३)**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | पावती क्रमांक | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | तुळींज-२ | NL02/979/19 | ११८४ | रशीद बेगम | मेहमूद अब्दुल सत्तार कुरेशी व साजिदा मोहमूद कुरेशी |
| २. | तुळींज-३ | NL03/936/10 | ११८५ | कमलेश सिंह | मोहरुनिशा गुलाम हुसैन शेख |
| ३ | तुळींज-३ | NL02/436/37 | ११८७ | मोहनी सलीयन | ऑल्वीन सेबस्टीन डिसोझा |
| ४ | तुळींज-२ | NL02/447/16 | ११८८ | के.के. ग्रुप | आफरीन शेख |
| ५ | तुळींज-१ | NL01/197/18 | ११९१ | फीरोज अहमद सिद्धीकी | अन्सारी फरीदा मोहम्मद सैफ |
| ६ | तुळींज-७ | NL07/403/13 | ११९७ | प्रदीप दळवी | मिनाक्षी अभिषेक राठोड व अभिषेक भगवानदास राठोड |
| ७ | तुळींज-७ | NL07/540/14 | ११९८ | मल्हार डेव्हलपर्स | प्रदीप दामोदर महाडिक |
| ८ | तुळींज-७ | NL07/308/5 | ११९९ | जंयता कालीपदा दास | रामकेश हिरालाल गुप्ता |
| ९ | तुळींज-२ | NL02/528/24 | १२०१ | सचिन शांताराम खामकर | स्मिता सुधीर कडू |
| १० | तुळींज-१ | NL01/95/3 | १२०२ | श्रीराम सरजू गुप्ता | साहेबलाल श्रीराम गुप्ता |
| ११ | तुळींज-१ | NL01/85/25 | १२०३ | एन.एच. राऊत | प्रकाश बाळकृष्ण जाधव व सिद्धी प्रकाश जाधव |
| १२ | तुळींज-२ | NL02/6114/14 | १२०७ | रोहीनी राजेन्द्र गोरे | अल्ताफ अली अब्दुलवाहाब अन्सारी |
| १३ | तुळींज-३ | NL03/1209/27 | १२११ | रविकांत राधेश्याम चौरसिया | दुर्गावती रामआचल उपाध्याय |
| १४ | तुळींज-३ | NL03/103/7 | १२१२ | किरण गंगाराम विचारे | संध्या प्रभाकर खानविलकर |
| १५ | तुळींज-२ | NL02/951/13 | १२१३ | बिपीन सिंह | प्रविणकुमार श्यामकृष्ण त्रिपाठी |
| १६ | तुळींज-२ | NL02/73/31 | १२१४ | अकिब जावेद अब्दुल रशीद शेख | यासमीन आकीब जावेद शेख |
| १७ | तुळींज-४ | NL04/442/78 | १२१८ | जगदीशनारायण ते. सिंह | गीतांजली गोपीनाथ धारपवार |
| १८ | तुळींज-२ | NL02/430/61 | १२२१ | गौरीदेवी भगवतीप्रसाद गर्ग | भगवतीप्रसाद सुरजमल गर्ग |
| १९ | तुळींज-३ | NL03/1139/53 | १२२२ | संजय पवार | महेंद्र ए साह व भावना महेंद्र शाह |
| २० | तुळींज-७ | NL07/502/37 | १२२३ | दत्ताराम शांताराम बांदल व सरिता बांदल | मीरा संतोष गुप्ता |

जावक क्र. वविशम/कवि/६३१/२०२२-२०२३
दिनांक : ०५/०८/२०२२

सही/-
**सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

08 TO 14 AUGUST 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 8/6/2022 10:09 PM Page 1



पान १ वरून...

## दागिने लुटण्यासाठी चंपाबाईचा ...

त्याचे समवेत त्यांचा मुलगा सून आणि नातू ही राहयला आहेत. चिंचवाड जवळच दत्त सहकारी साखर कारखाना असल्याने ऊस तोड कामगार ही राहयला आहेत.नंदीवाले वसाहतीमध्ये प्रकाश लक्ष्मण नंदीवाले हा ही राहयला आहे. तो ऊस तोड मजुर म्हणून काम करीत असताना त्याला चोरी करण्याची सवय लागली होती.गेल्या चार पाच वर्षात त्याने लहान मोठया चोऱ्या केल्या होत्या. तो त्या वसाहतीत एकटाच राहयला असल्याने त्याला त्या परिसरातील प्रत्येकाची परिस्थीती ही माहिती होती. चंपाबाई ककडे याच्या घरची परिस्थीती ही तशी बेताचीच असली तरी आता पर्यतच्या कष्टातून त्यांनी पैसा अडका सोने बरेच मिळविले होते. त्यांना ही इतर महिलाचांच्या सारखे सोन घालून मिरविण्याची हौस होती. त्याच्या गळ्यात सोन्याचे नेकलेस,गंठण होते.त्या घरी असले तरी ते सोने आपल्या गळ्यात काम घालत होत्या. त्याच्या गळ्यातील सोन्याचे दागिने पाहून प्रकाश नंदीवाले याची मती फिरली होती. तो कायम चंपाबाई यांना मावशी म्हणून हाक मारीत त्याच्या बरोबर बोलत असायचा. त्यामुळे अलिकडच्या काही महिन्यात त्यांची ओळख ही चांगलीच वाढली होती. तो कायम त्याच्याशी लाडीगोडी लावत बोलत होता. चंपाबाई यांना तो मुलासारखे असल्याने त्याही त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलत असायच्या. आपल्या घरात काय चालते काय नाही हे ही त्या त्याला सांगत असल्याने त्याला त्याच्या घरातील परिस्थितीचा अंदाज आलेला होता. प्रकाश नंदीवाले याला दारूचे आणि मटका खेळण्याचे व्यसन असल्याने तो कर्जबाजारी झाला होता. सकाळ पासून रात्रीपर्यत त्याला दारू पिण्याचे व्यसन जडले होते. त्यामुळे तो कोणताही कामधंदा करीत नव्हता.कायम नशेत असल्याने वसाहतीतील त्याचे नातेवाईक ही त्याला किमंत देत नव्हते.तो कामधंदा करीत नसल्याने त्याची बायको मुले ही त्याला सोडून गेले होते. तरीही तो ताळ्यावर येत नव्हता.तो दारू पिण्याचे काही सोडत नव्हता.त्यातच तो कामधंदा करत नसल्याने त्याला कायम पैशाची गरज भासत होती. त्याला कर्ज देणारे लोक ही त्याच्या मागे देणारे पाठलाग करीत होते.तो त्याच्या त्रासाला कंटाळले होते. पैशासाठी तो काही ही करायला तयार होता.त्याला आयते सगळे पाहिजे होते. कामधंदा करीत नसल्याने त्याला चोरी करण्याचा नाद लागला होता. आता त्याची नजर चंपाबाईच्या दागिण्यावर पडली होती. त्याच्या दागिण्यावर डल्ला मारायचा असा विचार त्याने केला होता.त्यासाठी त्याने चंपाबाई ककडे याच्या घराची दि.२८ जुलै २०२२ रोजी रेकी ही केली होती.रेकी केल्या नंतर त्याला आपले काम पत्ते करायचे होते. दि.३१ जुलैच्या रात्री ८ ते ९ च्या दरम्यान पाऊस जास्त पडत होता.नंदीवाले वसाहतीतील वीज ही गेली होती. चंपाबाई या घरात एकटयाच होत्या.त्याचवेळी प्रकाश हा त्याचे घरी गेला होता.नेहमी प्रमाणे तो आला असेल हे समजून चंपाबाई या त्याच्याशी बोलत थांबल्या होत्या.त्याने बोलत असताना त्याचेकडे पिण्यासाठी पाणी मागितले. त्या पाणी आणण्यासाठी स्वयंपाक खोलीत गेल्या असता तो त्याच्या मागून आत गेला. त्या पाण्याचा ग्लास भरण्यासाठी खाली वाकल्या असता त्याने पाठीमागून येऊन त्याच्या साडीने त्याचा गळा जोरात आवळला. त्या ओरडण्या प्रयत्न करीत असताना त्याने त्यांना खाली पाडले आणि आपली पुर्ण ताकद लावून त्याचा गळा आवळला.त्या निपचिप पडल्या होत्या. जागीच त्याचा मृत्यू झाला होता.या झटापटीत त्याच्या डोक्यावरची टोपी स्वंयपाक घरात पडली होती.त्याचे त्याला भान नव्हते.त्याने त्याचा गळा आवळ्यानंतर एकदम वीज आली. घरात लाईट लागल्याने त्याने गडबडीने त्याच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून घेऊन तेथून पोबारा केला. दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारच्या लोकांना चंपाबाई याच्या घराचा दरवाजा बंद दिसल्याने त्यांनी अजून कशी काय चंपाबाई उठल्या नाहीत म्हणून एका शेजारीन बाईने त्याना हाका मारून दरवाजा उघडून आत जावून पाहिले असता त्याना स्वयंपाक घरातील फरशीवर चंपाबाई या मृतावस्थेत पडल्या असल्याचे व त्याच्या गळ्या भोवती साडीचा फास असल्याचे दिसले. त्यांनी बाहेर येवून आरडाओरडा करून या घटनेची माहिति वसाहतीतील लोकांना दिली. लोकांनी ही घाई गडबडीने घटनास्थळी पाहिले असता त्यांना चंपाबाई ककडे याचा खून झाल्याचे दिसून आले. कुणी तरी या घटनेची माहिति शिरोळ पोलीसांना दिली.या घटनेची माहिति मिळताच शिरोळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.शिवानंद कुंभार यांनी घटनास्थळी आपल्या सहकाऱ्यासह भेट देवून पाहणी केली. शिरोळ पोलीसांनी घटनास्थळचा आणि घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शिरोळ येथील प्राथमिक रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांना माहिति मिळताच ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.घटनास्थळी जिल्हा पोलीस प्रमुख शैलेश बलकवडे, अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड यांनी भेट देवून परिस्थीतीची पाहणी करून पोलीसांना तपासाच्या योग्या त्या सुचना दिल्या. या घटनेचा पोलीस तपास करीत असताना चंपाबाई ककडे याचा खून कुणी आणि कोणत्या कारणतून केला याचा अंदाज पोलीसांना लागत नव्हता.मयत चंपाबाई ककडे याच्या नातेवाईकांनी त्याच्या गळ्यातील सोन्याचे दागिणे लंपास झाल्याची माहिति पोलीसांना दिली होती. यावरून ही घटना पोलीसांनी चोरीच्या उद्देशाने झाली असल्याचा अंदाज व्यक्त करून संशयीत रेकॉर्डवरील आरोपीची माहिति घेण्याचे काम चालू केले होते. तसेच या परिसरात कोण चोरी करू शकतो याची माहिति पोलीस घेत होते. पोलीसांनी घटनास्थळाच्या आजूबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ही तपासायला सुरूवात केली असल्याने परिसरातील संशयीत आरोपीच या घटनेत सामील असला पाहिजे अशी शंका पोलीसांना आली. या घटनेचा तपास शिरोळ पोलीसाच्या बरोबरीने स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करत होते. या पथकातील पो.निरी.संजय गोर्ले स.पो.नि.किरण भोसले व त्याचे सहकारी संशयीत आरोपीच्या मागावर होते. घटनास्थळी पोलीसांना फक्त एक टोपी मिळून आल्याने त्या अनुषंगाने अशी टोपी कोण घालू शकतो यावर पोलीसांची बारकाईने नजर होती. मंगळवार दि.२ रोजी या पथकातील पोलीस सांगली कोल्हापूर रस्त्यावर गस्त घालीत असताना त्यांना शिरोळ बायपास रोडवरील चौडेश्वंरी सहकारी सुत गिरणी जवळून एक तरूण आपल्या मोटार सायकलीवरून सुपर फास्ट जात असल्याचे दिसून आले. त्यांनी त्या तरूणाला अडवून त्याचेकडे चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याच्या डोक्यावर ही संशयीत आरोपी सारखीच टोपी असल्याने पोलीसांचा संशय अधिकच बळावला होता.त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याला पोलीस खाक्या दाखविताच त्याने चोरीच्या उद्देशाने चिंचवाड नंदीवाले वसाहतीतील चंपाबाई ककडे याच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून घेऊन त्याचा साडीने गळा आवळून खून केल्याचे कबुल केले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी मयत चपाबाई ककडे याच्या नातेवाईकाच्या कडून लेखी फिर्याद लिहून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी चंपाबाई भूपाल ककडे (वय ६५) याच्या खून प्रकरणी प्रकाश लक्ष्मण नंदीवाले (वय ३३) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,सह चोरीचा गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले असता. मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून चोरलेले सोन्याचे दागिने हस्तगत केले होते. या घटनेचा तपास शिरोळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.शिवानंद कुंभार आणि त्याचे सहकारी व स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीसांनी करून या घटनेतील संशयीत प्रकाश नंदीवाले याला घटनेनंतर ७२ तासाच्या आता ताब्यात घेऊन या घटनेचा छडा लावला होता. आजकाल वयोवृध्द महिलांना हेरायचे त्याचेकडील दागिने हिसकावून घेऊन चोरी करायचे प्रमाण खूप वाढले आहे.म्हणून शक्यातो अशा महिलांनी अनोळखी किंवा बोल बच्चन करणाऱ्या लोकांना जवळपास थारा देवू नये नाही तर सोन्याबरोबर जीवाला ही मुकावे लागते हेच या घटनेवरून दिसून येते.

## पिता पुत्राच्या नात्याला रक्ताचा...

पोलिस ठाण्यात संर्पक करून चिंचेली (ब.) येथील रहीवाशी आसलेला नागनाथ काळे हा इसम राहात्या घरी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची वार्ता पोलिसांना कळवीली. वार्ता मिळताच गातेगाव पोलीस ठाण्याचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक घारगे यांनी पोलीस उपनिरीक्षक कांबळे ,सहाय्यक फौजदार जाधव, पोलिस हेडकॉन्स्टेबल राजगीरवाढ, गिरी, मोरे, तांदळे, पोलीस नाईक पाटील, मुळे, दाडगे, तपघाले यांनी सोबत घेवून घटना स्थळाकडे धाव घेतली. गावत लोकांनी एकच गर्दी केली होती. कळे वस्तीत पोलिसांची गाडी येताच बघ्यांनी काढता पाय घेतला. पोलिसांनी घटनस्थळावर हजर होत घटनेची प्राथमिक माहीती जाणून घेतली. दरम्यान ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी गोसावी यांनी घटनास्थळाला भेट देवून पोलिस अधिकारी आणी कर्मचारी यांना महत्वाच्या सुचना देवून पंचनामा करणयाचे आदेश दिले. पोलिसांनी पंचनाम्याला सुरूवात केली. नागनाथ काळे यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे व त्यातून त्यांचा मृत्यु झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत होता.पोलिसांनी घटनास्थळावरी आवश्यक ती माहीती हास्तगत करून प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रूग्णालयात पाठविले. जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे, पोलिस अधिक्षक अनुराग जैन, ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सुत्र गातेगाव पोलीस ठाण्याचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक घारगे यांच्या हाती देण्यात आले. तपासाचे चक्र गतिमान करत अशोक घारगे यांनी या प्रकरणातील प्राथमिक माहीती घेण्यास सुरूवात केली. मुळचा गातेगाव येथील रहिवाशी आसलेला नागनाथ खंडू काळे हा बऱ्याच वर्षापुर्वी गातेगावपासून जवळच आसलेल्या चिंचेली (ब.) येथे कायमचा वास्त्व्यास गेला होता. तेथेच त्याचे १५ वर्षापुर्वी (बदललले नाव) चित्रा हीच्यासोबत लग्न झाले होते. चित्रा आणी नागनाथचा संसार काही दिवस सुखात गेला. हाताला लागेल ते काम करून नागनाथ आणी चित्रा आपल्या संसाराचा गाडा ओढत होते. दरम्यान त्यांना एक मुलगाही झाला. त्याचे नाव आकाश ठेवले. दरम्यन चित्रा आणी नागनाथ आपल्या मुलाच्या संगोपनात कुठेही कमी पडत नव्हते. आकाश आता शालीय जिवनातून प्रवास करीत होता. दरम्यान नागनाथला दारूची जास्त सवय जडली होती. त्यामुळे काळे कुटूंबात ताणतणावाचे वातावरण तयार झाले होते. कधी काही न बोलणार कधी कोणालाही न भांडणारा नागनाथ आधून मधून पत्नी आणी मुलाला क्षुल्लक क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करत होता. आशात तर नागनाथने कहरच केला होता. कामातून मिळालेल्या पैश्यातून दररोज ते दरू ढोसून येत होता. आकाशचेही शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले होते. तोही वाईट संगतीत हातपाय पसरत होता. त्यालाही दारू सारख्या भौतिक चैनीची चटक लागली होती.मुलाचे वागणे नागनाथला पटत नव्हते. त्यातुनच पत्नी मुलाचीच बाजु घेत आसल्याच समज नागनाथला झाला होता. नागनाथने रोजगार करणे बंद केले होते. नागनाथला दारू पिण्याची तलफ झाल्यास तो पत्नीला पैसे देण्यासाठी तगादा लावत होते. यातुनच नबरा बायकोत सततचे वाद विकोपाला जावून हाणामारी देखील होत होती. सततच्या वादामुळे काळे कुटूंबातील शांतता भंग पावली होती. त्यातूनच आकाशने वडीलांनी मारहाण करून तुला जिवंत ठेवणार नाही अशीही धमकी दिल्याची माहीती पोलिसांनी मिळवली होती. दरम्यान दहा ते पंधरा दिवसापूर्वी आकाशची आई आजारी असल्यामुळे दुसऱ्या गावाला गेली होती त्यामुळे आकाश आणि त्याचे वडील नागनाथ हे दोघेच घरी होते एवढी माहीती पोलिसांनी घेतली. पोलिसांनी तपासाची दिशा ठरवून काही गुप्त खबरे कामाला लावले. वडीलांचा मृत्यू झाला तरी आकाशला कुठलच दूख होत नसल्याचे आणी तो एखाद्या कारणाने दडपणाखाली आसल्याचे पोलिसांनी ओळखले. येथेच कुठेतरी पाणी मुरत आसल्याचे सपोनि अशोक घारगे यांनी ओळखले. एकंदरीत परस्थितीवरून संशयाची सुई आकाशकडे इशारा करत होती. या प्रकरणी संशयीत म्हणून पोलिसांनी आकाशला तब्यात घेतले. त्याला विश्वासात घेवून अधिक विचापूस केली असता त्यांने पोलिसांना असमाधानकरक उत्तरे दिली. त्याला पोलिसी खाक्या दखवताच त्यांनी आपल्या अन्य एका मित्राच्या मदतीने वडीलाचा खून केल्याची कबूली देवून सांगणयास सुरूवात केली. वडील दररोज दारू पिवून घरी येत होते.दारूच्या नशेत ते अश्लील शिवीगाळ करत होते. कधी कधी तर मारहाण देखील कारत होते. ते कुठलीही गोष्ट समजून घेण्यास तयार नव्हते. आई दिवसभर काम करून घर चालवत होती. एकढ करूनही ते दररोज या ना त्या कारणाने आईला शिरवाळ भाषेत बोलून मारहाण करत होते. त्यांचा या वागण्याचा आकाशला वैताग आला होता. त्यांचा कायमचा काटा काढण्याचा विचार आकाश करत होतो. सततच्या वादामुळे आकाशने वडीलांचा कायमचा काटा काढण्याचा निर्णय घेतला या कामात मदत करण्यासाठी त्याने आपला मित्र रोहित रघुनाथ भोपळे राहणार चिंचोली बल्लाळनाथ यांची मदत घेतली. सुरुवातीला रोहितने मदत करण्यास नकार दिला परंतु नंतर आकाश यांनी या कामासाठी तुला वीस हजार रुपये देण्याचे मान्य करताच रोहितने या कामासाठी होकार दिला. दनांक ३० जुलै २२ रोजी रात्री आठ ते साडेआठ वाजेच्या सुमारास नागनाथ काळे घरात एकटे असल्याची संधी साधून आकाश आणि रोहित दोघे घरी गेले. आणि घरात एकटेच असलेल्या नागनाथ काळे यांच्या गळ्यावर लोखंडी कोयत्याने वार केले गळा खोलवर चिरल्या मुळे काही वेळातच नागनाथ जमिनीवर कोसळला. त्यानंतर दोघेही घरातून बाहेर पडले आकाशने आपल्या मित्राकडे रक्ताने माखलेला कोयता दिला आणि एसटी बस मध्ये बसून त्याला व कोयत्याची विल्हेवाट लावण्यास सांगून पाठवून दिले. त्यानंतर आकाश वडील मेले की अजून जिवंत आहे हे पाहण्यासाठी घरी परत आला. तेव्हा नागनाथ मरण पावल्याचे त्याच्या लक्षात आले त्यानंतर आकाश ने आपला चुलत भाऊ आणि इतर नातेवाईकांना आपले वडील घरात मरून पडले असून त्यांच्या गळ्यातून रक्त निघत असल्याची माहिती दिली. आणी वडीलांनीच दारूच्या नशेत गळा कापून घेतल्याचा कांगवा केला. आकाशने दिलेल्या माहीतीवरून गातेगाव पोलिसांनी या प्रकरणातील दुसरा आरोपी रोहित रघुनाथ भोपळे याला गजाआड करत उत्कृष्ठ कामगिरी केली. ही कामगिरी जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे, पोलिस अधिक्षक अनुराग जैन, ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी गोसावी यांचया मार्गदर्शनाखाली गातेगाव पोलीस ठाण्याचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक घारगे, पोलीस उपनिरीक्षक कांबळे, सहाय्यक फौजदार जाधव, पोलिस हेडकॉन्स्टेबल राजगीर वाढ, गिरी, मोरे, तांदळे, पोलीस नाईक पाटील, मुळे, दाडगे, तपघाले यांनी अधिक तपास यांनी केली. या प्रकरणी गातेगाव पोलिसात गुन्हा रजिस्टर नंबर ८८/२२ कलम ३०२ २०१ ३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गातेगाव पोलिस ठाण्याचे सपोनि अशोक घारगे करीत आहेत.

पान ८ वरून...

## 'घरोघरी तिरंगा'उपक्रम यशस्वी ...

करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाबाबत सांगितले की, १४ ऑगस्ट रोजी पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांसाठी १० किलोमीटर दौड आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्थानकातील अधिकारी व कर्मचारी मागील १ महिन्यापासून सदर दौड यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सराव करत आहेत. तसेच पोलीस वसाहतीतील अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानावर तिरंगा ध्वज फडकविण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांनी सांगितले की, घरोघरी तिरंगा या उपक्रमांची जनजागृती करण्यासाठी शाळा, महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ग्रामीण भागात घरोघरी तिरंगा फडकविण्यासाठी ग्रामपंचायती मार्फत जनजागृती करण्यात येत आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमध्ये ग्रामस्थांनी उत्स्फुर्तपणे आपला सहभागा नोंदवावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांनी केला आहे.

## घरोघरी तिरंगा अभियानासाठी...

समाजातील सर्वस्तरातील जनतेमध्ये देशाभिमान जागृत करणारा व स्वातंत्र्य संग्रामात हुतात्म्य पत्करलेल्या विरांपासून प्रेरणा घेणारा आहे. हा उत्सव साजरा करताना लोकसहभाग हा या कार्यक्रमाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. कारण त्यात लोकांच्या भावना, विचार व मते जुळलेली आहेत. घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत ग्रामीण भागात ध्वज उपलब्ध करून देण्यासाठी व्यापारी बांधव, विविध संस्था-संघटनांची मदत मिळविण्यात येत आहे. या उपक्रमात ध्वजाची प्रतिष्ठा राखण्यासाठी ध्वजसंहितेचे पालन व्हावे. ध्वज स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावावा. सूत, लोकर, पॉलिस्टर, सिल्कचा ध्वज लावता येईल. प्लास्टिकचा असू नये. त्याचा आकार ३÷२ असावा. ध्वज मळलेला किंवा फाटलेला नसावा, ध्वजसंहितेचे पालन व्हावे. दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ हे तीन दिवस घरोघरी तिरंगा फडकवताना दररोज संध्याकाळी झेंडा खाली उतरवाची आवश्यकता नाही. मात्र शासकीय कार्यालयांना या संबंधी ध्वजसंहितेचे पालन करावे लागणार असल्याचे आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी सांगितले. सदर उपक्रमाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी प्रत्येक सरकारी अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवा मंडळे, लोक प्रतिनिधी यांचा सहभाग व सहकार्य घेण्यात येणार आहे. यामध्ये पोस्टर्स व बॅनर्स लावणे, शाळामधुन मुलांच्या स्पर्धा घेणे, प्रभात फेऱ्या काढणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. तिरंगा स्वयंसेवकाच्या नेमणुका करुन त्यांच्या मार्फत कार्यक्रमाची प्रचार प्रसिध्दी व अंमलबजावणी करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर मोक्याच्या ठिकाणी जसे बसस्थानक, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा रुग्णालये, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळी होर्डिंग/बॅनर्स लावण्यात आली आहे. जिल्हयातील शासकिय इमारती, ऐतिहासिक वास्तूंना तिरंगी विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. गावस्तरावरील घरोघरी तिरंगा फडकवल्याचे ड्रोनद्वारे फोटो घेणे व व्हिडीओ शुटींग करण्यात येईल. घरोघरी तिरंगा उपक्रमाची अंमलबजावणी ही दि . ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत करण्यात येणार असल्याने या सप्ताहात घ्यावयाच्या विविध कार्यक्रमांचे उदा. स्वच्छता मोहिम, महिला मेळावे, अर्थ साक्षरता, शेतकरी मेळावे, इ. बाबत तारीखवार कार्यक्रम घेण्याबाबत विभागस्तरावरुन सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्राव्दारे निर्देशीत करण्यात आल्याचेही आयुक्त यांनी यावेळी सांगितले. हा उपक्रम संपूर्ण कोकण विभागात यशस्वी करण्यासाठी नागरिकांना सहभागाचे आवाहन आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी केले.

## लातूर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे ...

नागसेन कामेगावकर, रत्नदीप अजनिकर, नामदेवराव इगे, प्रा.एम.पी.देशमुख, कलीम शेख, इसरार पठाण, सचिन गंगावणे, यशपाल कांबळे, अभिजित इगे, हमीद बागवान, अकबर माडजे, अभिषेक पतंगे, अक्षय मुरळे, विजय टाकेकर, अमित जाधव, कुणाल वागज, राजू गवळी, अराफत पटेल, युनूस शेख, करीम तांबोळी, पवनकुमार गायकवाड, अजय वागदरे, शैलेंश भोसले, जय ढगे, अशोक सूर्यवंशी, मेनोद्दीन शेख, अमोल गायकवाड, जमालोद्दीन मणियार, पिराजी साठे, धनजय शेळके, धनराज गायकवाड, प्रमोद जोशी ,सायरा पठाण, सत्यवान कांबळे, राहुल कांबळे, बाप्पा मार्डीकर, राजाभाऊ गायकवाड, संदीपान सूर्यवंशी, मुश्ताक पटेल, अभिषेक देशमुख, खाजपाशा शेख, काशिनाथ वाघमारे, रामकीशन गडीमे, संजय बिराजदार, रणधीर सुरवसे, अजित सूर्यवंशी, संजय खंडापूरकर, लक्ष्मण मोरे, सुशील खरोसे, विष्णुदास धायगुडे, मंगेश वैरागे, आकाश भागवत, खुनमिर मुल्ला, भागवत माळी, अँड.विकास सूळ, शेख अस्लम, शेख हुसेन, सचिन सूर्यवंशी, अजय यादव, बाळासाहेब करमुडे, सौ कमल शहापुरे, सुमन चव्हाण, कमलताई मिटकरी, मंदाकिनी शिखरे, मीनाताई टेकाळे, मिनाज पठाण, संजय ओहोळ, काशिनाथ केंद्रे, रामराजे काळे, सय्यद अमन आदी उपस्थित होते.

## लातुर रोड ते नांदेड नवीन...

नांदेड हा नवीन मार्ग झाल्यास लातूरसह याचा फायदा उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, परभणी या जिल्ह्यातील जनतेला होणार आहे. लातुर ते तिरुपती ही नवीन रेल्वे गाडी सुरुवात करण्यात यावी अशी मागणी खासदार सुधाकर शृंगारे यांनी केली आहे, या संदर्भात केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लातूर जिल्ह्यातून तिरुपती दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. लातूरहून तिरुपतीला थेट गाडी नसल्याने भाविकांना विकाराबाद जंक्शन वरून प्रवास करावा लागत आहे, तिरूपतीसाठी रेल्वे गाडी सुरू करावी ही लातूरकरांची गेल्या अनेक वर्षाची मागणी आहे. या गाडीची गरज लक्षात घेऊन केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी ही गाडी सुरुवात करण्या सबंधी सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तर लातुर-मुंबई एक्स्प्रेस गाडीला नव्याने एसी बोगी जोडण्यात यावी अशी मागणी खासदार सुधाकर शृंगारे यांनी केली आहे, या गाडीला वातानुकूलित बोगी कमी आहेत, त्यामुळे प्रवाश्यांची अडचण होते आहे. ही मागणी देखील मंजूर करण्यात आली आहे. लातुर रेल्वे स्टेशनवर पीट लाईन उभारण्या बाबतही मंत्री रावसाहेब दानवे यांनी अनुकूलता दर्शविली आहे. लातुर येथे उभारण्यात आलेल्या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचा शुभारंभ लवकरात लवकर करण्यात यावा ही मागणी देखील खासदार सुधाकर शृंगारे यांनी केली आहे. या बरोबरच चाकूर तालुक्यातल्या जाणवळ येथे भुयारी मार्ग उभारण्याचीही मागणी करण्यात आली आहे. लातुर स्टेशनवरून जाणाऱ्या मात्र कोविड काळात बंद झालेल्या सर्व गाड्या पुन्हा सुरुवात करण्यात याव्यात अशी मागणी खासदार सुधाकर शृंगारे यांनी केली आहे.

## रमेश हणमंते यांच्या चक्रव्युह...

यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल दलित मित्र सुरेश चव्हाण,प्रा.रामकिशन समुखराव, उत्तम दोरवे, शिवाजी गायकवाड, अशोक गवळी, अशोक तोगरे, लिंबराज कांबळे, व्यंकट सरवदे, मधुमती हनमंते, गौरी गायकवाड, वैशाली महालिंगे आदिंनी अभिनंदन केले आहे.

## झेडपी शिक्षण विभागात ...

प्रक्रिया राबवित असताना, असे असताना सोलापूर जिल्ह्यात मात्र काही ठराविक प्राथमिक शिक्षक, शिक्षिकाच्या बदल्या केव्हाही आणि कधीही होत आहेत. त्यामुळे शिक्षकात शिक्षण प्रशासनाबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे याबाबत शिक्षक संघटना समन्वय गुरु सेवा परिवाराच्या वतीने राज्य शासनाच्या ग्रामीण विकास विभागाचे सचिव व शिक्षण सचिवांना याबाबत निवेदन देऊन ही गंभीर बाब निदर्शनास आणली जाणार आहे. यापूर्वी विस्थापित शिक्षकांची गैरसोय दूर करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या आदेशावरून जिल्ह्यातील ५६ शिक्षकांची समुपदेशानी पदस्थापना देण्यात आली आहे. त्यातील बरेच शिक्षक कार्यमुक्त होऊन दिलेल्या शाळेवर हजर झाले आहेत. पण अद्याप काही शिक्षक पदस्थापनेत बदल करून घेण्यासाठी गेल्या चार महिन्यापासून शाळेला दांडी मारून जिल्हा परिषदेत ठिय्या मारून असल्याचे दिसत आहे. धक्कादायक बाब म्हणजे प्रशासनातील काही मंडळींचा या शिक्षकांना पाठिंबा असल्याचे दिसत आहे. या शिक्षकांचा पगारही काढला जातोय पण दुसरीकडे मात्र शिक्षक संघटनांनी एखाद्या शिक्षकाच्या अपरिहार्य कारणास्तव बदलीची मागणी केली की ऑनलाईन बदल्याचे कारण पुढे केले जाते. तालुक्यांतर्गत जादा झालेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याचे अधिकार गटशिक्षणाधिकाऱ्यांना असताना जिल्हास्तरावरून सेवाजेष्ठता डावलून बदल्या केल्या जात आहेत, असा आरोप शिवानंद भरले यांनी केला आहे.

## विद्यार्थ्यांनो... जीवनात यशस्वी...

आपली एखाद्या सोबत केलेली तुलना हा आपला अपमान नसून ती एक प्रेरणा असते आणि आपल्या आई-वडिलांना आपला अभिमान वाटावा असे वर्तन आपल्याकडून होणे अपेक्षित आहे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे म्हणाले की, आपला शैक्षणिक विकास साध्य करण्यासाठी शैक्षणिक नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे हित हेच आपल्या महाविद्यालयाचे ब्रीद वाक्य आहे आणि ते सातत्याने जोपासण्याचा प्रयत्न केला जातो. यावेळी पर्यवेक्षक प्रा.एस.व्ही.पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाची जबाबदारी शिक्षकाची असली तरी त्यावर देखरेख ठेवणे हे पालकाचे कर्तव्य असते असे ते म्हणाले. या कार्यक्रमांमध्ये प्रा.व्ही.सी.पाटील यांनी संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे नियोजन सर्वांना सांगितले. तर प्रा.नितीन वाणी व प्रा.संगमेश्वर पानगावे यांनी नीट-जेईई परीक्षासंबंधी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा.माधवराव पाटील (टाकळीकर) म्हणाले की, महाविद्यालयाच्या विकासामध्ये संस्था पदाधिकारी, शिक्षक, पालक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे मोलाचे योगदान असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षका सोबतच आई-वडिलांचे अधिक महत्त्व असते. त्यामुळे आपणही आपल्या पाल्याला सातत्याने सातत्याने मार्गदर्शन केले पाहिजे. आपल्या पाल्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमच्या संस्थेमार्फत सातत्याने विविध सोयी-सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला जातो. विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध अभ्यास करून मोठी स्वप्ने बघितली पाहिजे त्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमांमध्ये सचिन पाटील यांनी महाविद्यालयातर्फे प्रत्येक विद्यार्थी आणि पालकाला प्रत्येकी एक वृक्ष भेट देण्यात आले व वृक्षाची योग्य ती काळजी घेऊन त्याचे संगोपन करण्याचेही माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.श्रद्धा अवस्थी (मीसर) यांनी केले तर आभार डॉ.शितल येरुळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.जी.एल. पांढरे, प्रा.एन.ए.गोरे, प्रा.आर.एच.सुदाम, प्रा.एस.एम. पाटील, डॉ.जी.एस.बिरादार, प्रा.के.आर.सूर्यवंशी, प्रा.एम.यु.सरपे, प्रा.एम.डी. नायने, प्रा.के.डी.गिराम, डॉ.टी. घन:श्याम, प्रा.एस.बी. माळी, प्रा.एस.जी.माळी, प्रा.के.आर.बिरादार, प्रा.जी.जी. ठाकूर, प्रा.व्हि.जे.दुडिले, प्रा.एम.ए.वैरागकर, प्रा.अलका चीकुर्डेकर, प्रा.सोनू स्वामी, योगेश मोदी, संतोष येचेवाड, शुभम बिराजदार, संजय गिरी, संतोष राठोड, संदीप मोरे, आनंद खोपे, जलील सय्यद आदींनी सहकार्य केले.

क्राईम संध्या | सोमवार दि. ०८ ऑगस्ट २०२२ ते रविवार दि. १४ ऑगस्ट २०२२ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# समाज व राष्ट्रहितासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी सकारात्मक काम करावे - बाळासाहेब जाधव



**अहमदपूर/प्रतिनिधी**

सद्यस्थितीला पोलीस प्रशासनात कामाच्या प्रचंड व्यापामुळे अधिकाऱ्यांच्या समोर मोठ्या प्रमाणात ताणतणावाचे वातावरण असल्याचे सांगून समाज व राष्ट्रहितासाठी पोलीस अधिकाऱ्याने निष्कलंक, कर्तव्यनिष्ठ व पारदर्शक दृष्टिकोन ठेवून काम करावे असे प्रतिपादन लोकनेते तथा माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांनी केले. उपविभागीय पोलीस अधिकारी बलराज लंजिले यांच्या सेवापूर्ती निमित्त पोलीस प्रशासनाच्या वतीने त्यांचा सपत्नीक भव्य सत्कार सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे, आमदार बाबासाहेब पाटील, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष विनायकराव पाटील, भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके पाटील, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, जि प चे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, जिल्हा परिषद सदस्य अशोकराव केंद्रे, उपजिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी प्रवीण मेनशेट्टी, सहाय्यक पोलीस अधीक्षक अनिकेत कदम, तहसीलदार रामेश्र्वर गोरे, सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी श्रीधर पवार, सेवानिवृत्त पोलीस अध्यीक्षक सुधाकर रेड्डी सह मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे म्हणाले की बलराज लंजिले यांनी जीवनभर पारदर्शी व गोरगरीब, अन्यायग्रस्त, लोकांना प्रामाणिकपणे न्याय देण्याचे कार्य केल्याचे सांगितले. यावेळी आमदार बाबासाहेब पाटील म्हणाले की राजकारणामध्ये सद्यस्थितीला चांगल्या चारित्र्यसंपन्न माणसांनी येण्याची गरज असल्याचे सांगून चांगल्या माणसाच्या कार्याची उंची अंत्यविधी व निरोपाच्या भावस्पर्शी सोहळ्याच्या निमित्ताने लक्षात येते असे सांगितले. यावेळी माजी मंत्री विनायकराव पाटील, गणेशदादा हाके पाटील यांच्यासह प्रवीण फुलारी, अनिकेत कदम, विक्रांत गुजमगुंडे,रामभाऊ तिरुके, चितांबर कामठेवाढ,डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, प्रा. विश्वंभर स्वामी, सुशांत जगताप यांचे मनोगत पर भाषणे झाली. सेवापूर्ती निमित्त संयोजन समितीच्या वतीने बलराज लंजिले व सौ कविताताई लंजिले यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र , वृक्ष देऊन उपस्थित मान्यवर व प्रशासनातील अधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस निरीक्षक रामेश्र्वर कदम यांनी तर सूत्रसंचालन रामलिंग तत्तापूरे व प्रा. मारोती बुद्रुक पाटील यांनी तर आभार सहाय्यक पोलीस निरीक्षक नौशाद पठाण यांनी मांनले. प्रारंभी सजवलेल्या जीप मधून पोलीस स्टेशनच्या आवारा तुन बलराज लंजिले यांचा शहराच्या प्रमुख रस्त्यावरून मिरवणुक काढण्यात आली. यावेळी बलराज लंजिले आणि कविता लंजीले यांचा विविध राजकीय पक्ष, मित्रपरिवार, व्यापारी मित्रपरिवार आणि ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. हृदयस्पर्शी सत्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड, पोलीस निरीक्षक परमेश्र्वर कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक नौशाद पठाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश बँकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र केदार सह पोलीस कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गाडेकर कुटूंबाला एएनजे कंपनीकडून एक लाखांची मदत



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील गोऱ्हे येथे शॉर्ट सर्किटमुळे घराला आग लागून घरासह घरातील सर्व सामान जळून खाक झाले आहे. रविवारी (१ ऑगस्ट) रात्रीच्या सुमारास लागलेल्या आगीत घर भस्मसात होऊन गाडेकर कुटुंबियांवर बेघर होण्याची वेळ आली असल्याने शेलटे गावातील ए.एन.जे टर्नकी पोजेक्टस प्रा. ली. या कंपनीच्या वतीने त्यांना आर्थिक मदतीचा हाथ दिला आहे. गाडेकर कुटुंबीयांवर इतरही ठिकाणांहून मदत असली तरी कंपनी व्यवस्थापनाने माणुसकीची जाणीव ठेवत तातडीची आर्थिक मदत म्हणून हेमंत गाडेकर यांना २५ हजार रुपये, आई रुक्मिणी गाडेकर यांना २५ हजार रुपये तर रणधीर गाडेकर हे दुर्धर आजाराने त्रस्त असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी ५० हजार रुपयांची असे एकूण १लाख रूपयांचे धनादेश कंपनीचे डायरेक्टर मघारामजी कुलरीया यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी कंपनीचे उपाध्यक्ष संदेश पाटील, इंजिनिअर उमेश पाटील, अक्षय जाधव, रूतीक गायकवाड, अनिकेत गायकवाड, शेल्टे गावचे सरपंच राजू गायकर, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गोऱ्हेकर यांच्यासह अनेक महीला व ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच आग विझवण्यासाठी कंपनीकडून अग्निशमन दलाला तातडीने पाण्याची व्यवस्था करून दिल्याबद्दल कंपनीचे डायरेक्टर मघाराम कुलरीया तसेच फायर फायटर सिस्टिम चे कर्मचारी निलेश गायकर यांचे ग्रामस्थांडून आभार व्यक्त करण्यात आले.

# महिलांसाठी स्तनाचा कर्करोगा विषयी मार्गदर्शन शिबिरा संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा पालघर द्वारा संचालित माहेर लोकसंचालीत साधन केंद्र व पहिले माझे कर्तव्य फाउंडेशन यांच्या सयुंक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिबिरात महिलांसाठी स्तनाचा कर्करोग या विषयावर डॉ.नयना कनल यांनी मार्गदर्शन केले. शुक्रवारी (दि.५ऑगस्ट) कंचाड येथील माहेर लोकसंचालित साधन केंद्र येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्या नंतर माविमची प्रार्थना घेण्यात आली व उपस्थित पाहुण्यांचा स्वागत, सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले तर माहेर लील च्या वार्षिक अहवालाचे वाचन व्यवस्थापक निकिता भोईर यांनी केले. मौलाना आझाद महामंडळाचे शेख सर यानी लील चे कार्य व माविम करत असलेल्या कार्याची माहिती दिली. तर सेंट जॉन कॉलेज मधून आलेले देशमुख यांनी १० वी पास झालेल्या विद्यार्थ्यांना हार्डवेअर, प्लम्बिंग एअर कंडीशनिंग आणि रेफ्रिजरेशन अशा अनेक कोर्सेस बाबत मार्गदर्शन केले. तसेच पहिले माझे कर्तव्य फाउंडेशन च्या फाउंडर नयना कनल यांनी त्या स्वतः ब्रेस्ट कॅन्सर च्या ३ स्टेज पर्यन्त जाऊन आपल्याला झालेले कॅन्सर सारख्या गंभीर आजाराला मात करुन कशा प्रकारे बाहेर आल्या याचे त्यानी मनोगत व्यक्त केले व आपल्या ग्रामीण भागातील महिलांनी आपली स्वतःची काळजी कशी घ्यावी स्वताला कॅन्सरची लगन झाली आहे का हे कसे ओलखावे या बाबत उत्तम मार्गदर्शन केले.



## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त पिंपळास येथे वृक्षारोपण

वाडाः महात्मा गांधी रोजगार हमी योजना जिल्हा परिषद पालघर आणि टाटा मोटर्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त पाच लाख वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात येत असून या कार्यक्रमाचा शुभारंभ पाली आणि मांडा गटातील पिंपळास येथे करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या अक्षता चौधरी जिल्हा परिषदेचे अधिकारी माळी, वाडा पंचायत समितीचे सभापती रघुनाथ माळी, उपसभापती सागर ठाकरे, जिल्हा परिषद सदस्य अरुण ठाकरे, पंचायत समिती सदस्य योगेश गवा, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, पंचायत समितीच्या कृषी विभागाचे सर्व अधिकारी, ग्रामसेविका व नागरिक उपस्थित होते.

# भिवंडीत सात दिवसात तब्बल २१ लाख रुपयांची वीज चोरी करणाऱ्यां ८ जणां विरोधात गुन्हे दाखल

भिवंडी : भिवंडी शहरामध्ये विज चोरीच्या घटनांमध्ये लक्षणे वाढ झालेली असतानाच भिवंडी व नजीकच्या ग्रामीण भागात विज वितरण व विज बिल वसुली करणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनीने विज चोरांविरोधात कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतले आहे. मागील सात दिवसात तब्बल आठ जणांविरुद्ध २१ लाख ७९ हजार ४५६ रुपयांच्या विजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आला आहेत. तन्वीर युसूफ मोमीन रा.इस्लामपुरा, ३ लाख ३० हजार ९२ रुपये, राहीलबानो सुलेमान अन्सारी, रा. बंगालपुरा ७६ हजार ६५७ रुपये,सोलापूरकर सय्यद युनूस रा.शास्त्री नगर २ लोक २ हजार४८ रुपये शोएब शहनवाज बर्डी रा.निजामपुरा ८ लाख ६७ हजार ९५६, गुलाम अली रियाज अहमद मोमीन रा.इस्लामपुरा ११ हजार ७८९ रुपये, विकास पाटील रा.सूरई गाव १ लोक ७९ हजार ९५९,स्वप्नील अर्जुन पालवे रा.रामनगर अंजुरफाटा १ लाख १३ हजार ३०३ रुपये, जगन्नाथ झिपऱ्या म्हात्रे रा.राजनोली नाका ३ लाख ७९ हजार ६५२ अशा पद्धतीने आरोपींनी अनधिकृतपणे वीज जोडणी करून विद्युत पुरवठा घेऊन ही वीज चोरी केली असून शांतीनगर पोलीस ठाण्यात यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आचवला येथील अतिवृष्टी भागात जिल्हाधिकारी पृथ्वीराज यांची भेट




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील आचवला येथील भागात रविवारी सायंकाळी ढगफुटी सदृश्य पावसाने झोडपले होते. या भागात मंगळवार दि.२ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी.यांनी भेट देऊन पाहणी केली व आढावा घेतला. रविवारी सायंकाळी आचवला भागात ढगफुटी सदृश्य पावसाने झोडपले होते. परिणामी रस्त्याला ओढ्याचे स्वरूप आले होते तर शिवार चक्क जलमय झाल्याने खरीपाच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आचवल येथील सदरील भागाला जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी.यांनी भेट देऊन आढावा घेतला. यावेळी उपविभागीय अधिकारी निलंगा शोभा जाधव देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांची उपस्थिती होती. यावेळी आचवल येथील उपसरपंच नामदेव कारभारी यांनी जिल्हाधिकारी बी.पी.यांच्या भेटीत सांगितले की, आचवल येथे फक्त कोरडवाहू शेती आहे. शिवारात जलसिंचनाची सोय नसल्याने पाण्या अभावी शेतकऱ्यांचे मोठे हाल होत आहे. आचवला शिवारात जागृती शुगर्स आहे. तरी देखील आचवला शिवारात एक एक्कर पण ऊस शेती नाही. ही आचवलकरांची शोकांतिका आहे.

जिल्हाधिकारी साहेबांनी आचवलसाठी विशेष बाब समजून जलसिंचनाच्या विहिरी अधिक प्रमाणात उपलब्ध करून द्यावे अशीही मागणी यावेळी उपसरपंच नामदेव कारभारी यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी बोलताना केली. यावेळी धोंडीराम पाटील, धनाजी पाटील, बंटी माहाराज, विजयकूमार चिलमे, निवृत्ती कांबळे यांच्यासह ग्रामस्थ शेतकरी उपस्थित होते.

**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/१८६/२०२२ दिनांक : ०४/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत मौजे भराड तालुका डहाणू येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०५/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १८/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२२२/२०२२ दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे कुडुस तालुका वाडा येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारणात्मक पूर्नजोडणी करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/१८६/२०२२ दिनांक : ०४/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत मौजे गिरगाव तालुका तलासरी येथे नळ पाणी पुरवठा योजनेचे रेट्रोफिटींग करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०५/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १८/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२००/२०२२ दिनांक : ०५/०८/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत मौजे उधवा तालुका तलासरी येथे नळ पाणी पुरवठा योजनेचे रेट्रोफिटींग करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०५/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १८/०८/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

# देवणी येथील तरुणाचा संशयास्पद मृत्यू; वडिलांची पोलीस अधिक्षकांकडे तक्रार

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील धनगरवाडी येथील तरुणाचा अपघाती मृत्यू झाला नाही. तर त्याचा घात करून खुण करण्यात आला आहे. अशी तक्रार मयताचे वडील विठ्ठल निवृत्ती बोडके यांनी पोलीस अधीक्षक लातूर यांची गुरुवार दि.४ ऑगस्ट रोजी भेट घेऊन लेखी तक्रार दाखल केली आहे. दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे की, मयत निळकंठ विठ्ठल बोडके वय २३ वर्षे याला दि.२५ जुलै रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्याच्या गावातील मित्राने वाढदिवसाचे कारन सांगून फोन केला व वलांडी येथे बोलावून घेतले. त्यानंतर त्याच मित्राने रात्री दोन वाजण्याच्या सुमारास फोन करून मयताच्या वडीलांना सांगितले की तुमच्या मुलाचा अपघात झाला आहे. त्याला उदगीर येथे उपचारासाठी घेऊन जात आहे असे सांगितले. मात्र दुसऱ्या दिवशी माहिती समोर आली की, माझ्या मुलाचा लातूर येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. माझ्या मुलाचा अपघाती मृत्यू झाला नसून त्याचा जाणीवपूर्वक खुण करण्यात आला आहे. संबंधित दोन्ही संशयित मित्रांचे नावेही पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमूद आहेत. सदरील घटनेतील दोषींवर कायदेशीर कारवाई करून मला न्याय मिळवून द्यावे असे मयताचे वडीलांनी मागणी केली आहे.

# 'घरोघरी तिरंगा'उपक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व समाजघटकांनी एकत्रित येऊन उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवावा - जिल्हाधिकारी गोविंद बोडके



**पालघर/प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घरोघरी तिरंगा लावण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद व पोलीस प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व समाजघटकांनी देखील या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हर घर तिरंगा हा उपक्रम १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान देशामध्ये उत्साहाने साजरा होणार. या पार्श्वभूमिवर जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) संजीव जाधवर यांची संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी श्री. बोडके बोलत होते.

दानशुर व्यक्ती, उद्योजक यांनी सामाजिक उत्तरदायीत्वाच्या माध्यमातून तिरंगा ध्वज खरेदी करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले. घरोघरी तिरंगा उपक्रमाअंतर्गत ग्रामपंचायतस्तरापासून ते जिल्हास्तरापर्यत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामुळे नागरिकांमध्ये जागृती येऊन ते या मोहीमेत उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवतील असा विश्वास जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकविण्यासाठी जिल्ह्याला ६ लाख ५० हजार तिरंगा ध्वजाची आवश्यकता आहे. सध्या २ लाख ५० हजार तिरंगा ध्वज प्राप्त झाले आहेत व उर्वरीत तिरंगा ध्वज लवकरच प्राप्त होतील तिरंगा ध्वजाची विक्री करण्यासाठी नगरपरीषद क्षेत्रात प्रत्येक वार्डामध्ये विक्री केंद्र उभारले जाणार आहेत. तसेच ग्रामिण भागामध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ध्वज विक्रीकेंद्र स्थापन करण्यात येणार आहे. तिरंगा ध्वजाची विक्री किंमत २१ रुपये असून जास्तीत जास्त नागरीकांनी ध्वज खरेदी करावा असे आवाहनही जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले आहे. ज्या व्यक्तींना ध्वज खरेदी करणे शक्य होणार नाही अशा व्यक्तींसाठी जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी हे देणगी स्वरुपात मदत करत आहेत. प्रशासनाकडे देणगी स्वरुपात आतापर्यत २५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. पुढील काही दिवसात या रक्कमेमध्ये निश्चित वाढ होईल असा विश्वासही जिल्हाधिकारी गोंविद बोडके यांनी व्यक्त केला. जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील यांनी घरोघरी तिरंगा जनजागृती उपक्रमाअंतर्गत ...पान ६ वर

# घरोघरी तिरंगा अभियानासाठी कोंकण विभाग सज्ज - डॉ. महेंद्र कल्याणकर



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दि.१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत कोकण विभागातील घरे, सरकारी/खाजगी आस्थापना तसेच ग्रामीण भागातील राष्ट्र ध्वजाची एकूण मागणी संख्या ३७ लाख ३९ हजार ११८ असून त्यापैकी ३० लाख ५९ हजार ५०२ ध्वज उपलब्ध आहेत. केंद्र शासनाकडून ८ लाख ७९ हजार ४४४ ध्वजांची वाढीव मागणी करण्यात आल्याची माहिती कोकण विभागीय आयुक्त (अतिरिक्त कार्यभार) डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली. हर घर तिरंगा उपक्रमाच्या प्रचार प्रसिध्दी व जनजागृतीसाठी कोकण भवन इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आज आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपायुक्त मकरंद देखमुख, उपायुक्त रविंद्र जाधव, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे आणि मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते. पत्रकारांशी संवाद साधतांना डॉ. कल्याणकर म्हणाले की, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हा दि. ९ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे विविध उपक्रम राबवून साजरा होतो आहे. या महोत्सवाचा भाग म्हणून कोकण विभागात घरोघरी तिरंगा हा अत्यंत महत्त्वकांशी उपक्रम दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान राबविण्यत येणार आहे. घरोघरी तिरंगा हा उत्सव प्रत्येक व्यक्तीचा, कुटुंबाचा व ...पान ६ वर

# रमेश हणमंते यांच्या चक्रव्युह काव्यसंग्रहास राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार प्रदान



**लातूर/प्रतिनिधी**

येथील कवी रमेश हनमंते यांच्या चक्रव्युह या दुसऱ्या काव्यसंग्रहाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचा दुसरा राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार डॉ.भालचंद्र रक्तपेढी सभागृहात सांकेत प्रकाशनचे प्रकाशक तथा ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीच्यावतीने दरवर्षी विविध साहित्य प्रकारातून राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार दिले जातात, सन २०२१ च्या राज्यस्तरीय द्वितीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार (७५० रुपये, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि शाल) कवी रमेश हनमंते यांच्या चक्रव्युह या काव्यसंग्रहाला अकादमीचे अध्यक्ष ॲड. संभाजी बोडके, डॉ.सोमनाथ रोडे, डॉ.माधव गादेकर, कुसूम बोडके, ॲड.श्रीधर गायकवाड, वंदना गादेकर, ॲड.अंगद गायकवाड यांच्या उपस्थितीत बाबा भांड ...पान ६ वर

# लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे महागाई विरोधात आंदोलन




**लातूर/प्रतिनिधी**

केंद्रातील भाजपा सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशामध्ये दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. पेट्रोल, डीझेल, घरगुती गॅसचे वाढलेले दर आणि जीवनावश्यक वस्तूंवर वाढलेल्या जी.एस.टी मुळे सर्वसामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे. केंद्रसरकारने देशातील युवकांच्या भविष्याचा कोणताही विचार न करता घाईघाईत चालू केलेल्या भारतीय सैन्यदलातील अग्निपथ योजनेमुळे देशातील युवकांचे भविष्य धोक्यात आले आहे. या सर्व बाबींचा व केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी लातूर शहर व जिल्हा काँग्रेसच्या वतीने अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सूचनेवरून मा. प्रांताध्यक्ष श्री. नानाभाऊ पटोले यांनी दिलेल्या निर्देशानुसार, राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख व मा. आमदार. धिरज विलासरावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार, दि. ५ ऑगस्ट २०२२ रोजी लातूर शहरातील काँग्रेस भवन समोर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी वाढत्या इंधन दरवाढीचा निषेध म्हणून चुलीवर स्वयंपाक करुन महिला काँगेस या आंदोलनात सहभागी झाली.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष अँड.किरण जाधव, सौ. स्मिता खानापुरे, सौ. सपना किसवे, डॉ. सुधीर पोतदार, गोरोबा लोखंडे, विजयकुमार साबदे, लक्ष्मण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, अँड. देविदास बोरूळे पाटील, रमेश सूर्यवंशी, सुरेश चव्हाण, इम्रान सय्यद, व्यंकटेश पुरी, प्रा.प्रवीण कांबळे, प्रा. सुधीर आनवले, ज्ञानेश्र्वर सागावे, शरद देशमुख, तबरेज तांबोळी, युनूस मोमीन, सचिन मस्के, आसिफ बागवान, जब्बार पठाण, केशरताई महापुरे, सुलेखाताई कारेपूरकर, ज्ञानोबा गवळे, शीतल मोरे, आबासाहेब पाटील, सचिन बंडापल्ले, बालाजी एम.साळुंके, दत्ता सोमवंशी, ...पान ६ वर

## खासदार सुधाकर शृंगारे यांनी घेतली केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट!

# लातुर रोड ते नांदेड नवीन रेल्वे मार्गाच्या उभारणीची मागणी



**लातुर/प्रतिनिधी**

लातुर जिल्ह्यातल्या विविध प्रश्नांना घेऊन खासदार सुधाकर शृंगारे यांनी दिल्लीमध्ये केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान लातुररोड ते नांदेड या नवीन रेल्वे मार्गाचे तातडीने सर्वेक्षण पूर्ण करून रेल्वे मार्गाची उभारणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. लातूररोड ते ...पान ६ वर

# झेडपी शिक्षण विभागात बदल्यांसाठी एजंटगिरी

# आमदाराचा पीए मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा एजंट का?

## अनुकंपा भरतीवेळीही मांडला गेला बाजार

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**




सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील कावळवाडी झेडपी शाळेतील शिक्षकाच्या बेकायदा बदलीवरून वाद आता चांगलाच जिल्हा परिषदेत रंगला आहे. बेकायदा बदल्या करण्यासाठी झेडपीच्या शिक्षण विभागात एजंटगिरी (साखळी) सुरू असून अनुकंपा भरतीच्यावेळीही कंत्राटी कर्मचाऱ्याने बाजार मांडला होता, असा आरोप शिक्षक संघाचे नेते शिवानंद भरले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. करमाळा तालुक्यातील कावडवाडी झेडपी शाळेतील शिक्षक शिंदे यांची नुकतीच प्रशासनाने बदली केली आहे. या बेकायदा बदली विरोधात १२ शिक्षक संघटना पहिल्यांदाच एकत्रित आल्या आहेत. प्रशासनाने ही बदली तात्काळ रद्द न केल्यास आंदोलन करण्याचा शिक्षक संघटनांनी इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक संघाचे नेते शिवानंद भरले यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात चाललेल्या सावळा गोंधळावर मोठा आरोप केला आहे. जिल्हा परिषद शिक्षकांसाठी राज्य शासन ऑनलाईन बदली ...पान ६ वर

### एजंटांना हाकला!

सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागात अशी नियमबाह्य कामे करून घेण्यासाठी काही बाहेरील मंडळी सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. कावळवाडी शाळेतील शिक्षकाच्या बदलीसाठी एका आमदाराच्या पीएने खटाटोप केल्याची चर्चा जिल्हा परिषदेत चर्चेचा विषय झाला आहे. याबाबत संघटनेने तक्रार केल्यावर दबाव आणला जात असल्याचेही भरले यांनी म्हटले आहे. काही दिवसापूर्वी अनुकंपा भरती झाली. यावेळी तर एका व्यक्तीने बाजारच मांडला होता, असा आरोप करून भरले यांनी खळबळ उडवून दिली आहे. शिक्षण विभागात चाललेला हा गोंधळ राज्य शासनाच्या निदर्शनाला आणून दिला जाणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने सध्या अनुकंपा भरती काढली आहे. ही प्रक्रियाही पारदर्शकपणे पार पाडावी अशी आता मागणी होत आहे.

# विद्यार्थ्यांनो... जीवनात यशस्वी होण्यासाठी चतु:सूत्रीचा अवलंब महत्वाचा; प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ.विठ्ठल लहाने



**लातूर/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनो! तुम्हाला जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर ०४ सी म्हणजे कमिटमेंट (जबाबदारी), कन्सिस्टन्सी (सातत्य), कॉन्फिडन्स (विश्वास) आणि कनेक्शन म्हणजे (संबंध) या चतु:सूत्रीचा अवलंब करा त्यामुळे आपले जीवन अधिकाधिक सुखी, समृद्ध आणि निरोगी बनेल असे प्रतिपादन प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ.विठ्ठल लहाने यांनी बोलताना व्यक्त केले. येथील महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखा, युवती मंच आणि महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा संपन्न झाला यावेळी ते आपुलिया हिता जो असे जागता या विषयावर मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा.माधवराव पाटील (टाकळीकर) यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून ड.शांतविर चौधरी, प्रचिती कॉम्प्युटरचे संचालक उदय देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे, पर्यवेक्षक प्रा.एस.व्ही.पवार, एच.एस.सी. बोर्ड समन्वयक प्रा.व्ही.सी. पाटील, युवती मंच अध्यक्ष व तत्वज्ञान विभागप्रमुख डॉ.शीतल येरुळे, निट/जेईई समन्वयक प्रा.एस.एस.पानगावे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.विठ्ठल लहाने म्हणाले की, आपले जीवन जगत असताना आपल्याला विविध प्रकारच्या अडचणी येत असतात. यामध्ये गरिबी ही एक आपल्या सर्वांना अडचण वाटते मात्र ती एक आपल्या विकासासाठी असलेली शक्ती आहे त्यामुळे आपण त्या शक्तीचा उपयोग करून आपले जीवन सुखी बनविले पाहिजे. ...पान ६ वर

# शेत जमिनीतील खैराच्या झाडांची चोरी



**वाडा/प्रतिनिधी**

गुटखा बनवण्यासाठी खैर जातीच्या लाकडाचा वापर होत असल्याने तालुक्यात खैराच्या झाडांची चोरी नेहमीच होत असते. बिलावली येथील शेतकरी नितीन भास्कर डोहाळे हे नेहमीप्रमाणे शुक्रवारी (दि.५ऑगस्ट) सकाळी शेतावर गेले असता त्यांच्या जागेत वेगवेगळ्या ठिकाणी लावलेली खैराची २० ते २५ झाडे तोडून चोरली असल्याचे निदर्शनास आले आहे. ही झाडे बुडा पासून तोडली आहेत तर फांद्याही छाटून टाकून दिल्या आहेत तर खोड काढून ट्रक किंवा टेम्पोमध्ये भरून नेले असल्याची शक्यता डोहाळे यांनी वर्तवली आहे. लाखो रुपयांची किंमत असलेली खैरांची झाडे रात्रीच्या सुमारास चोरल्या बाबत डोहाळे यांनी वाडा पोलीस ठाणे व वन विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

# राहुल गांधींनी घेतली लिंगायत धर्माची दिक्षा



**लातूर/प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष व काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी महात्मा बसवेश्वरांच्या विचारांवर श्रध्दा ठेवून परवा कर्नाटकातील एका कार्यक्रमात लिंगायत धर्माची दिक्षा घेतली. त्याबद्दल राहुल गांधींचे अभिनंदन! व लिंगायत महासंघाच्यावतीने त्यांचे लिंगायत धर्मात हार्दिक स्वागत करण्यात आल्याचे लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांनी सांगितले. १२व्या शतकात समानतेचे धोरण स्विकारणारे महात्मा बसवेश्वर खुप मोठे क्रांतीकारक होते. त्यांनी बाराव्या शतकात पहिला आंतरजातीय विवाह लावला. त्यांनी जगात पहिल्यांदा लोकशाही अंमलात आणली. अनुभवमंटपरूपी संसदेची त्यांनी स्थापना केली. अशा महात्मा बसवेश्वरांच्या विचारांवर व लिंगायत धर्माच्या तत्वावर श्रध्दा ठेवून काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी लिंगायत धर्माची दिक्षा घेतली. त्यांचे लिंगायत महासंघ महाराष्ट्र राज्याच्यावतीने हार्दिक अभिनंदन! व लिंगायत धर्मात त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले आहे. राहुल गांधी हे सहिष्णु नेतृत्व असून सर्व धर्माचा आदर करणारे व अन्यायाविरूध्द झटणारे पुरोगामी विचाराचे व्यक्तिमत्व आहे. सध्या त्यांचा पक्ष सत्तेत नसला तरी आजही प्रबळ विरोधी पक्षाचे नेते म्हणून राहुल गांधी यांच्याकडे पाहिले जाते. कर्नाटकाच्या हवेरी मटाच्या महास्वामीजींनी ते उद्याचे पंतप्रधान असतील अशी भविष्यवाणी केली आहे. या धर्मगुरूंच्या भविष्यवाणीचे लिंगायत महासंघाने स्वागत केले आहे. राहुल गांधी यांनी जगद्गुरू मुरूग्गा राजेंद्र विद्यापीठाचा दौरा केला आणि डॉ.शिवमुर्ती मुरूग्गा शरणारू यांच्याकडून त्यांनी इष्टलिंग दिक्षा घेतली. राहुल गांधींनी घेतलेल्या दिक्षेमुळे कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यातील लिंगायत समाजात आनंदाचे वातावरण पसरले आहे. या दिक्षेमुळे लिंगायत समाज हा राहुल गांधींच्या पाठीमागे उभा टाकेल असा विश्वास लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांनी व्यक्त केला.

# होनाळी सोसायटीच्या चेअरमनपदी अनिल पाटील तर व्हा.चेअरमन पदी महेश पाटील



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील होनाळी येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमपदी प्रा.अनिल व्यंकटराव पाटील तर व्हा.चेअरमन पदी महेश वैजनाथ पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नूतन संचालक गुंडेराव बिरादार,गोविंदराव बिरादार,विलास घंटे, आकुंश बिरादार, सचिन चौधरी, अशोक आलूरे, विजयकुमार बालुरे,महमूद पटेल, शेटिबा काळे, श्रीमती सूर्यकलाबाई बेळकोने,श्रीमती संगीता मुळे यांची संचालक पदी निवड झाली आहे. यावेळी नूतन संचालक यांचा सत्कार ग्राम पंचायत कार्यालय होनाळी तर्फे करण्यात आला. यावेळी उपसरपंच औदुंबर पांचाळ होनाळीकर, सरपंच सतीश बिरादार, शिवाजी बिरादार, नंदू शेठ इंद्राळे,दिलीप दादा बिरादार, बालाजी बिरादार माजी सरपंच,सतीश बिरादार, महमद शेख सर, संदीप बिरादार, लक्ष्मण चांदोरे,नितीन अलूरे, शिवाजी रामतीर्थे, सारंग पाटील, कोंडल बिरादार,आदीसह गावकरी उपस्थित होते.